
# माणूस

शनिवार । ३१ डिसेंबर १९७७
७५ पैसे


" हा एक चौरस माणूस आहे;
म्हटला तर फटिंग, म्हटला तर गृहस्थ.
म्हटला तर कवी, स्वप्नाळू, एकलकोंडा आणि हळवा.
आयुष्यात प्रेम भेटेल, साहसाची संधी येईल
अशी अपेक्षा करणारा.
हा ऐट अशी आणेल की
आपण कोणी शास्त्रज्ञ नाहीतर सरदार आहो;
पण इकडे-तिकडे बघून
रस्त्यातले बिडीचे थोटूकही तो उचलेल.
किंवा पोराच्या हातातली
रेवडी पळवायलाही कमी करायचा नाही.
रागावला ना फार, तर गरतीबाईच्या देखील
कानफटात देईल. "
चॅप्लिनची बडबड चालूच होती.

आणि रुपेरी पडद्यावर एक अनोखे रसायन
त्या दिवशी सजीव झाले !



**चक्रमचक्री....** (पृष्ठ ४–५)

# साप्ताहिक माणूस

**वर्ष सतरावे-अंक एकतीस**

**३१ डिसेंबर १९७७**

**मूल्य पंचाहत्तर पैसे**



संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


# सप्रेम नमस्कार

¤ 'माणूस दिवाळी-७७' वाचला. एकूण अंकच मुळी एक उफ्फाद सवेदना बाळगून आहे, हे नक्की ! अभिनंदन ! !

विशेषत: व्हिन्सेंट व्हॉन गॉग. तो एक अपूर्व अनुभव होता वाचनाचा.

माझ्या आजवरच्या वाचनात इतका अस्वस्थ अनुभव क्वचितच मिळाला, तो 'माणूस'ने उपलब्ध करून दिला, म्हणून आभार ! मी एक चित्रकार असतो तर फार बरं झालं असतं, ते तर आजवरचं केवळ वाटणंच आहे. शब्द फारच फसवतात, रंगाना ते फसवता येत नाही, हा माझा अनुभव. तो एकदम साधा आहे.

शक्य असेल तर श्रीमती माधुरी पुरंदरेंना माझी त्याबद्दल कृतज्ञता द्या. फार मोठं आयुष्य त्यांनी पकडून आमच्या अशक्त, दुर्बल ओंजळीत दिलं आहे म्हणून-!

कळावे, आपला

**सु. म. तडकोडकर**

---

## साहित्यिक आणि शब्दकार

¤ श्री. विनय हर्डीकर यांचा लेख आणि त्यानंतर श्री. श्री. ना. पेंडसे यांचे मुक्त चिंतन वाचले. मी स्वत: आणीबाणीच्या पहिल्या महिन्यात भूमिगत असताना योगायोगाने श्री. पां. वा. गाडगीळ व श्री. श्री. ना. पेंडसे यांच्या दूरदर्शनावरील मुलाखती पाहिल्या-ऐकल्या होत्या. दोघांनीही त्या वेळी केलेले 'आणीबाणीचे समर्थन पाहून मनस्वी चीड व त्याहूनही अधिक खंत निर्माण झाली होती. श्री. पेंडसे यांनी दिलेल्या मुलाखतीचा भाग कापला गेला होता. हे एवढ्या उशिराने आम्हाला कळते आहे. ठीक आहे; परंतु त्या निमित्ताने श्री. पेंडसे यांनी केलेले मुक्त चिंतन अधिक महत्त्वाचे आहे.

श्री. विनय हर्डीकर यांनी ज्याचे व्यक्तिमत्त्व घडत आहे अशा सवेदनाशील तरुणाच्या व्यथा अतिशय संयत शब्दात मांडल्या आहेत. त्याबद्दल त्याचे खरोखरच अभिनंदन करायला हवे; पण त्यांचे केवळ अभिनंदन करून चालणार नाही तर त्यांनी मोजक्या शब्दात व्यक्त केलेल्या स्फोटक भावना लक्षात घेऊन श्री. पेंडसे यांनी काही मूलगामी उपाय सुचवायला हवेत. त्याऐवजी श्री. पेंडसे यानीही एक प्रश्नमालिकाच उभी केलेली आहे.

आणीबाणीच्या निमित्ताने आपल्या समाजातील शक्तिहीनता विदारकपणे समोर आली; पण ती यापूर्वी कधीच आली नव्हती का ? समाज चारी अंगांनी ढासळतो आहे, नीतिमूल्यांचा ऱ्हास चालू आहे, कणा लिबलिबित बनतो आहे,हे यापूर्वी कधीच कळले नाही का ? आमच्यासारख्या समाजकारणात व राजकारणात काही ध्येयनिष्ठा घेऊन वावरणाऱ्यांना ते पदोपदी जाणवते व त्याविरुद्ध आमच्यापरीने आम्ही झगडतही आहोत; पण किती विचारवतांनी वा साहित्यिकांनी त्या प्रयत्नांची बूज ठेवली ? कथा, कादंबऱ्या, नाटके यांच्यामधून जीवनाला सामोरे जाऊन मूलगामी चिंतन करणारे किती लेखक आहेत ? आपण 'लिहिणे' एवढेच काम नसून प्रत्यक्षात काही 'करणे' आवश्यक आहे असे किती विचारवंतांना मनापासून वाटते ? लेखनशैली, प्रतिभा अशा निसर्गदत्त गुणांना सामाजिक व्यथामध्ये किती जणांनी भिजवले आहे ? 'सारा समाजच असा आहे' असे म्हणून निदान विचारवंतांना गप्प बसता

येईल का? श्री. पेंडसे यांच्या विवेचनातून या प्रश्नाबाबतची काही निश्चित भूमिका समजत नाही.

'रक्त न साडता, किमत न मोजता स्वातंत्र्य मिळाले, हे एकमेव कारण या सर्व अवनतीच्या मुळाशी आहे, का अन्यही काही कारणे आहेत, याचा प्रामाणिकपणे विचार झाला पाहिजे असे मला वाटते. तीस वर्षांपूर्वी अगदी किमत न मोजता स्वातंत्र्य मिळाले, असे आपण गृहीत धरू या; पण तरीही गेल्या तीस वर्षांत राष्ट्रजीवनाला आकार यावा यासाठी काही प्रयत्न झालेच नाहीत का? आणि झाले असले तर साहित्यिकाचा त्यातला वाटा किती आहे?

समाज घडवायचा असेल तर काही श्रद्धांच्या आधारावर त्याला उभे करावे लागते. नव्या काळाच्या संदर्भात जुन्या धार्मिक श्रद्धा पुरेशा नाहीत. एवढेच नव्हे तर, त्या फलदायीही नाहीत; पण त्याऐवजी काही नव्या श्रद्धा विचारपूर्वक, चिकाटीने निर्माण करायला नकोत का? पण तसे घडण्याऐवजी 'श्रद्धा' या संकल्पनेचीच थट्टा सर्वत्र होत असते आणि श्रद्धेच्या या हननप्रक्रियेत साहित्यिक हे सर्वांत अधिक जबाबदार आहेत असे म्हटले तर चुकेल का? जुन्या श्रद्धांची चेष्टा आणि त्यांचे अवमूल्यन सतत करायचे आणि नव्या श्रद्धा देण्याची कुवत नाही अशी काही तरी विचित्र साहित्यसृष्टी निर्माण झालेली आहे.

हुकूमशाहीविरोधी लढ्यात रा. स्व. संघाने सिंहाचा वाटा उचललेला आहे. आणीबाणीच्या काळात संघ व त्या परिवारातील अन्य संस्थाचे लक्षावधी कार्यकर्ते सत्याग्रहात उतरले, काही लाख कार्यकर्ते दीड दीड वर्ष तुरुगात राहिले. अनेकांनी भूमिगत राहून, हाल सोसून हुकूमशाहीविरोधी लढा चालवला व अंती लोकशाहीच्या विजयात त्याचे रूपांतर झाले. संघाबाबत असलेले सर्व मतभेद मान्य करूनही एवढे प्रचंड 'लोकसंग्रह' घडवणाऱ्या रा. स्व. संघाची दखल साहित्यिकांनी घेतली का? त्याचे पडसाद साहित्यात उमटले का? का त्यासाठीही 'रक्त न सांडता...' हेच कारण आपण सांगणार? समाजातील सर्व प्रकारच्या घटनाचे पडसाद ज्या साहित्यात उमटतात ते खरे साहित्य, असे म्हणतात. त्या कसोटीला गेल्या नऊ-दहा महिन्यांत निदान 'छत्रपतीच्या महाराष्ट्रातले' साहित्यिक तरी उतरतील का? आजही साहित्यसंमेलनासारख्या प्रसंगी काही उदात्त अनुभवायला मिळण्याऐवजी क्षुद्र मानापमानाचेच प्रदर्शन पाहायला मिळते याला काय म्हणायचे? हे सर्व पाहून असे वाटते की, साहित्यिक हा शब्द आपण फार सवंगपणे वापरतो. जसा लोहकार, चर्मकार, सुवर्णकार तसाच 'शब्दकार' हा शब्दच अधिक योग्य ठरेल. लोहार, चर्मकार किंवा सुवर्णकार ज्याप्रमाणे आपल्या कुशलतेने वस्तू घडवतो त्याच कुशलतेने आमचे हे 'शब्दकार' नाटक, कथा, कादबरी इ. दागिने घडवत असतात. ना त्यात भावनेचा सबंध, ना संस्काराचा आशय.

अर्थात काही लेखक आपापल्यापरीने राष्ट्रजीवन घडविण्याचा प्रयत्न करीत आहेत व त्यांचे ऋणही सर्वजण मान्य करतात; पण सरस्वतीच्या दरबारातील असे मोजके लोक सोडले तर सर्वत्र आनंदीआनंद आहे.

'सारा समाजच असा' म्हणून निदान विचारवंतांना स्वस्थ बसता येणार नाही आणि ते तसे स्वस्थ बसणार असतील तर मग 'असे का?' विचारण्याचा त्यांना अधिकार राहणार नाही. श्री. पेंडसे यांच्या साहित्याचा मी एक चाहता आहे. वरील विवेचनात त्यांच्यावर व्यक्तिगत काहीच आरोप मला करायचा नाही. त्यांची व्यक्तिगत माहितीही मला फारशी नाही; पण श्री. हर्डीकर यांच्या तरुण मनातले कढ आणि त्याचे श्री. पेंडसे यांच्या प्रगल्भ विचारशक्तीवर उठलेले तरंग पाहून माझ्या मनात जे आले ते मोकळेपणी लिहिले आहे. एका सामाजिक कार्यकर्त्याच्या मनातले मोडकेतोडके विचार शब्दबद्ध करायचा हा प्रयत्न आहे. तो निरपवाद आहे असा माझा दावा नाही.

१९ डिसेंबर — डॉ. अरविंद लेले, पुणे

---

## मित्रहो...

'माणूस'मधून मी गेल्या दीड वर्षाहून अधिक काळ नाट्य-चित्रपटविषयक लेखन सातत्याने व गंभीरपणे करण्याचा प्रयत्न केला.

पुष्कळ काही लिहून झाले आहे. त्याला वाचकमित्रांची भरपूर दादही मिळाली आहे. काही थोडे अद्यापही लिहायचे राहून गेले आहे. पण ते पुन्हा कधी तरी.

काही खाजगी व काही सार्वजनिक कारणांमुळे नाट्य-चित्रपट परीक्षणे काही काळ बंद करण्याचा निर्णय मी व संपादकांनी घेतला आहे. मी लिहीत असताना मला वेळोवेळी सहकार्य / प्रोत्साहन देणाऱ्या, विरोध करणाऱ्या अथवा काहीही न करणाऱ्या माझ्या सर्व वाचक व न–वाचक मित्रांना हार्दिक धन्यवाद.

शिरीष सहस्रबुद्धे

## चक्रम्‌चक्री (२७)

दीर्घस्मृती विश्वनाथ

# हास्य आणि अश्रू यांचे रुपेरी रसायन

दिग्दर्शक सेनेट बुचकळ्यात पडला होता. हॉटेलच्या लॉबीचा सेट समोर तयार होता. नट,–नट्या रंगून उभ्या होत्या, कॅमेरामनही सज्ज होता; पण स्टुडिओतल्या त्या सेट्वर कोणते दृश्य दाखवायचे तेच निश्चित होत नव्हते. सिगरेटचे टोक कुरतडत सेनेट स्वस्थ उभा राहिला. 'एक-दोन चुटके हवेत इथं...' तो स्वत.शीच पुटपुटला. इतक्यात त्याचे लक्ष जवळच उभ्या असेलेल्या चार्लीकडे गेले. 'जा रे, सोंगाड्याचा वेष घेऊन ये! काहीही चालेल!'

चार्ली न बोलता रंगपटाकडे चालला. आता आपण कसली भूमिका रंगविणार याचा काहीच अंदाज त्याला नव्हता. रंगपटाकडे जाता जाता त्याने ठरविले की एक अघळपघळ भोंगळ पॅन्ट, अंगासरसा–जरा घट्टच– कोट, भले फत्ताडे बूट, वेताची काठी आणि डोक्याला फिट्ट बसणारी हॅट असा पोषाख करावा. रूप कसं बेंगरूळ दिसलं पाहिजे. पॅंट सैल, तर कोट घट्ट; हॅट लहान तर बूट फत्ताडे. खोड्याळ पोराने सहज मास्तराच्या उपरण्याला टाकाचे नीब पुसावे त्याप्रमाणे त्याने स्वत.च्या तुकतुकीत ओठावर बारक्याशा मिशीची झालरही बसविली.

पोषाख तर झाला; पण आता काम कसले करणार? चार्ली हातात काठी खेळवीत सेटवर फेऱ्या घालू लागला. एक भूमिका त्याच्या मनात झपाट्याने आकार घेऊ लागली होती. आपले सोंग सेनेटला समजावून सांगताना तो म्हणाला, 'हा एक चौरस माणूस आहे; म्हटला तर फटिंग, म्हटला तर गृहस्थ; म्हटला तर कवी, स्वप्नाळू, एकलकोंडा आणि हळवा; आयुष्यात प्रेम भेटेल, साहसाची संधी येईल अशी अपेक्षा करणारा. हा ऐट अशी आणील की आपण कोणी शास्त्रज्ञ नाही तर सरदार आहो; पण इकडे-तिकडे बघून रस्त्यातलं बिडीचे थोटूकही उचलील किंवा पोराच्या हातातली रेवडी पळवायलाही कमी करायचा नाही. रागावला ना फार, तर गरती बाईच्यादेखील कानफटात देईल!'

'बरं बरं, बस झालं. काम करून दाखव बघू!' सेनेट कावला. चार्लीने सुरवात केली. तो हॉटेलच्या लॉबीत शिरला. एखादा फिरस्ता गांवढा सुखवस्तू माणसाची ऐट आणीत हॉटेलात सहजी जाईल, तसा. शिरताच एका बाईच्या पायात पाय अडकून पडला. उठून तसाच चालणार, तोच त्याला आठवण झाली; डोक्याची हॅट काढून 'माफ करा हं!' असे पुटपुटला. दोन पावलं जातो, तोच सतरंजीच्या सुरकुतीत पाय अडकला. गांवढा उठला आणि झटकन् हॅट काढून त्याने सतरंजीची माफी मागितली. हंशाचा खकाणा उधळला.

रुपेरी पडद्यावर एक अनोखे रसायन त्या दिवशी सजीव झाले!

□

मूकपटाच्या जमान्यातले ते सुरुवातीचे दिवस होते. चित्रपटाचे तंत्र त्या वेळेस फारच प्राथमिक अवस्थेत होते. कथालेखन, दिग्दर्शन, अभिनय, नेपथ्य इत्यादि अंगांचा विकास तेव्हा झालेला नव्हता. एकच माणूस सुचेल त्या प्रकाराने या साऱ्या बाजू सांभाळायचा. त्यामुळे चित्रपटाची कथा आधी तयार नसे. एक-दोन चमकदार मध्यवर्ती कल्पना घेऊन एखादा वग सुरू करावा आणि मग तो जमेल तसा रंगवीत न्यावा हे जसे तमाशात घडते, तसेच या पहिल्या–पहिल्या चित्रपटाचे असे. कलावंत प्रतिभाशाली असले तरी अनगड हिऱ्याप्रमाणे असत. तंत्राच्या सफाईपेक्षा स्फूर्तीवर त्यांची भिस्त असे.

त्यामुळे चित्रपटांचा एक ठरीव सांगाडा प्रत्येक निर्मात्याजवळ तयार असायचा. एक फटिंग माणूस आणि त्याची भटकंती. हा फटिंग माणूस जनावरापेक्षा तसूभरच सुधारलेला; अन्न–वस्त्र–निवाऱ्याच्या शोधात भटकणारा. या शोधात त्याच्यावर कोसळणारी संकटे आणि त्यातून सुटका याची एक माळ गुफलेली असायची. इथे दिग्दर्शक –निर्माता–कथालेखक याचे कसब पणाला लागत असे. भटक्यावर गुदरणारे प्रसंग आणि त्यातून होणारी त्याची सुटका या गोष्टी जितक्या विचित्र, नाविन्यपूर्ण आणि कल्पक वठतील तितका तो चित्रपट यशस्वी होत असे.

चार्ली चॅप्लिनचे वैशिष्टच असे की, त्याने मूकपटाला या प्राथमिक अवस्थेतून वर काढले. पाशवी पातळीवर वावरणाऱ्या आणि आयुष्यात येणाऱ्या संकटांना जमेल तसे तोंड देणाऱ्या चित्रपट–नायकाला त्याने विविध भूमिकांतून निरनिराळ्या भावनांची इतकी लेणी चढविली की, केवळ हास्यविषय म्हणून वावरणारे हे पात्र स्वस्तात करमणूक म्हणून मूकपट पाहायला येणाऱ्या हजारो गोरगरिबांच्या दैनंदिन धडपडीचे, इच्छा-आकांक्षाचे प्रतीक बनले. एक रीळभर लांबीचा फिल्मचा अबोल तुकडा; पण एकाच वेळी डोळ्यात पाणी आणि ओठावर हास्यरेखा उभी करण्याची केवढी अजब करामत त्याच्यात असते, याचा प्रत्यय चॅप्लिनने दिला.

चॅप्लिनचा विनोद हा कारुण्याने भिजलेला असायचा – हे म्हणणे खरे असले तरी फार ढोबळ आहे. तसा मूकपट हा कलाप्रकार ढोबळच आहे. चॅप्लिनच्या कलेचे अनेक नमुने– ज्याचे त्या काळी अतिशय कौतुक झाले– आज फारच बटबटीत आणि आक्रस्ताळेही वाटतील. त्याच्या 'ए डॉग्ज लाइफ' या चित्रपटात बेवारशी कुत्रा आणि भटक्या यांचे जीवन समांतर रीतीने चित्रित केले आहे. एका दृश्यात कुत्र्यांच्या मारामारीतून एका कुत्र्याला वाचवितात तर दुसऱ्या दृश्यात एका कुंटणखान्यातून वेश्येला वाचवितात; पण अशी बटबटीत उदाहरणे आहेत तशीच भाव-

नाचे सूक्ष्म हेलकावे दाखविणारे मूकपटही चॅप्लिनच्या नावावर आहेत. त्याच्या 'गोल्ड रश' या चित्रपटात नायिका भटक्याची टवाळी करते. या टवाळीतून तिला भटक्याविषयी एक दयायुक्त जिव्हाळा वाटू लागतो; पण भटक्याला मात्र वाटते की, नायिकेला आपल्याबद्दल प्रेमच वाटत आहे. त्याच्या 'द इम्मिग्रेट' या मूकपटात युरोपातून अमेरिकेत येणाऱ्या दरिद्री लोकांच्या जीवनाचे चित्रण आहे. नायक-नायिका प्रथम अमेरिकेत येणाऱ्या बोटीवर भेटतात. न्यूयॉर्कला उतरल्यावर नायिका आणि तिची आई एका दिशेने जातात, नायक दुसऱ्या दिशेने जातो. काही वर्षांनी नायक—नायिका न्यूयॉर्कमध्ये पुन्हा भेटतात. दोघेही पराभूत जिणे कंठीत असतात. बोलताना नायिका काळी कडा असलेला रुमाल काढते. तिची आई वारल्याचे त्यावरून नायकाला कळते.

चॅप्लिनने विनोद केवळ हसण्या—हसविण्यासाठी वापरला नाही; वरवर पाहता शिष्टसंमत वाटणाऱ्या वागणुकीत जे हीण मिसळलेले असते, सकृत्‌दर्शनी संयुक्तिक वाटणाऱ्या व्यवहारात जी विसंगती असते ती जर टिपली तर विनोद निर्माण होतोच; पण आपली जीवनाची जाण अधिक प्रगल्भ बनते. आयुष्यातील अवचिताला आपण अधिक समंजसपणे सामोरे जाऊ शकतो. ही जाण कारुण्याने युक्त असते; पण गहिवराने ओंगळ झालेली नसते. चॅप्लिनने हास्याला कारुण्याची जोड दिली ती या अर्थाने.

चॅप्लिन मूकपटातील विनोदाला हे नवे गहिरे परिमाण देऊ शकला. कारण अगदी लहान वयातच जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या धडपडीचा कठोर अनुभव त्याने घेतला होता. त्याचा बाप आणि आई दोघेही तमाशात काम करणारे कलावत होते. बाप दारुड्या आणि बाहेरख्याली होता. आईला वेडाचे झटके येत. दारिद्र्य आणि भूक पाचवीला पुजलेली होती. चार्ली आणि त्याचा भाऊ सिडनी वर्तमानपत्रे विकण्याचा धंदा करीत.

शेवटी एकदा परिस्थिती अशी झाली की, आई आणि दोन्ही मुले अशा सर्वांना अनाथालयाचा आश्रय घ्यावा लागला. अनाथालयात अन्न वस्त्र-निवाऱ्याची सोय होती; पण मुलांना मिळणारी वागणूक कठोर आणि कडव्या शिस्तीची. कोंडून ठेवणे, छडीने मारणे वगैरे शिक्षा नित्याच्या होत्या. त्यातून आईला आणि मुलांना निरनिराळे ठेवण्यात येत असे. पुढे असे झाले की, चार्लीच्या आईला वेड लागले आणि तिला इस्पितळात ठेवण्यात आले. त्याच वेळी कोर्टाने असे ठरविले की, चार्लीच्या वडिलांनी त्याचा आणि त्याच्या भावाचा प्रतिपाळ केला पाहिजे.

चार्लीचा बाप तेव्हा लुईझ् नावाच्या बाईबरोबर रहात होता. तिलाही मुले होती. सवतीची मुले म्हणून ती सिडनी आणि चार्ली याचा दुस्वास करी. त्याच्याकडून कामे करवून घेई. घालून-पाडून बोले. एकदा तर शनिवारी चार्ली घरी आला तो घराला कुलूप. त्याने खूप वाट पाहिली. रस्त्यावरून फेऱ्या मारल्या. थडी रक्त गोठवून टाकीत होती. अशा स्थितीत बेवारशी कुत्र्यासारखी त्याने रात्र काढली. मध्यरात्रीनंतर दारूने धुद होऊन ती बया आपल्या लहान मुलाला घेऊन परत आली आणि घरात जाऊन निजली. तिच्यानंतर चोरपावलानी चार्ली घरात शिरू लागला; पण लुईझला त्याची चाहूल लागली आणि तिने त्याला घरातून हाकलून दिले. असे प्रकार वारंवार होऊ लागले. एकदा तर चार्ली आणि त्याचा भाऊ उघड्यावर निजले असता पोलिसानी लुईझला दार उघडायला लावून सिडनी व चार्ली यांच्या झोपण्याची व्यवस्था करून दिली.

त्यानतर चार्लीची आई इस्पितळातून बाहेर आली. तिने दोन्ही मुलाचा ताबा घेतला. मुलेही तमाशात व नाटकात कामे करू लागली. दिवस बदलले. चार्लीचा तमाशाचा फड अमेरिकेत गेला. चार्ली तिथेच राहिला. मूकपटाच्या धंद्यात शिरला. निर्मिति, दिग्दर्शन, कथालेखन ( ? ) सगीत या सर्व बाजूचे ज्ञान त्याने मिळविले. अपार संपत्ती जमा केली, प्रसिद्धी मिळविली, थोरा—मोठ्याशी मैत्री झाली. हा सर्व जीवनपट बहुतेकांना माहीतच आहे.

बोलपटाचा जमाना सुरू झाला आणि चार्लीच्या प्रतिभेला आणखीच बहर आला. त्याचे बोलपट लोकप्रिय झाले आणि अफाट पैसाही त्यानी मिळविला; पण केवळ लोकरंजनाची दृष्टी चॅप्लिनने ठेवली नाही. सामाजिक अन्याय आणि विषमता, हुकूमशाही आणि दंभ याचा उपहास करणारे चित्रपट त्याने तयार केले. 'द डिक्टेटर' ह्या चित्रपटात त्याने हिटलरची टिंगल केली. त्या वेळी अमेरिका लढाईत उतरलेली नव्हती. प्रेसिडेंट रूझवेल्टने चॅप्लिनला बोलावून त्याच्याशी या चित्रपटाविषयी चर्चा केली.

दुसऱ्या महायुद्धानंतर चॅप्लिनने 'मंसिअ व्हेर्दु' आणि 'लाईम लाइट' असे दोन चित्रपट तयार केले. त्यापैकी व्हेर्दु या चित्रपटावर अमेरिकन सीनेटच्या 'कमिटी फॉर अन्‌अमेरिकन अॅक्टिव्हिटीज'ने आक्षेप घेतला. पुढे अमेरिकन सरकार त्याला निरनिराळ्या लफड्यात गुंतवू लागले. निरनिराळ्या कराच्या थकबाक्या काढू लागले. शेवटी कंटाळून चार्लीने अमेरिका सोडली आणि तो कायमचा स्वित्झर्लंडमध्ये येऊन राहिला.

चॅप्लिनने आयुष्यात अनेक चढ-उतार पाहिले. दारिद्र्याची गर्ता आणि श्रीमतीचे शिखर या दोहोंवरही तो सहजपणे वावरला. त्याने अनेक लग्ने केली. शेवटच्या ऊना या पत्नीवर त्याचा फार जीव होता. त्याचे आत्मचरित्र वाचले की, त्यातील अनुभवसमृद्धीमुळे आपण चकित होतो. चॅप्लिन हा अफाट माणूस होता; पण तितकाच व्यवहारकुशलही होता. २९ साली अमेरिकेत मदी आली आणि शेअर्सच्या सट्टयात अनेकांची बरबादी झाली; पण चॅप्लिनने आपले शेअर्स आधीच विकून त्यांचा पैसा केला होता. कारण, बेकारी वाढत असतानाच शेअर्सभाव वाढणे अनर्थाची खूण आहे हे त्याला पटले होते.

चॅप्लिनचे दु खी बालपण आणि त्याचे हजारो लोकांना आनंद देणारे चित्रपट यांचा एकत्र विचार करताना ऑस्कर वाईल्डच्या एका गोष्टीची आठवण होते. एका प्रियकराला हटेल प्रेयसीला देण्यासाठी ऐन हिवाळ्यात गुलाबाचे फूल हवे होते. त्याची विमनस्कता पाहून एका कोकिळेला दया आली आणि ती गुलाबाच्या झाडाकडे गेली. 'गुलाबा, मी काय केले म्हणजे तुला फूल येईल?' तिने विचारले. झाड म्हणाले, 'बाई ग, माझ्या काट्याला तुझे काळीज चिकटवून रहा. हृदयातून टिपकणाऱ्या रक्ताच्या थेंबांचा सडा माझ्या मुळावर पडू दे. म्हणजे वसतातसुद्धा येत नाही इतके लाल फूल येईल.' कोकिळेने तसे केले. दोघा प्रेमिकाचे मीलन व्हावे, त्यांच्या उजाड आयुष्याला उजळा मिळावा म्हणून तिने रक्ताचा सडा घातला.

गोष्ट जरा भडक आहे; पण तात्पर्यार्थाने खरी आहे. □

# अवती - भवती

शरद कृष्णन्

## □ पंतप्रधानांचे चिरंजीव !!

माजी पंतप्रधानांच्या चिरंजिवांनी एवढे प्रताप गाजविले आहेत की, आणीबाणी गेली, सरकार बदलले तरी पंतप्रधानांचे चिरंजीव म्हटले की, पोटात गोळा उभा राहतो. त्यात विद्यमान पंतप्रधानांच्या चिरंजिवांचा पूर्व लौकिकही फारसा स्पृहणीय नाही. त्यातून ते कामचलाऊ का होईना, परंतु स्वतंत्र व्यवसाय वगैरे करीत असते तर गोष्ट वेगळी; परंतु सध्या पंतप्रधान मोरारजीभाई देसाई यांचे चिरंजीव कांतिभाई पंतप्रधानांचे खाजगी चिटणीस म्हणून काम पाहतात आणि एका मुलाखतीमध्ये त्यांनी अगदी स्वच्छ सांगून टाकले आहे की, 'When the time comes, I'll be there.' इथं 'देअर' म्हणजे अर्थातच राजकीय रंगमंचावर... जनतेची सेवा वगैरे करायला. ब्लिटझवाल्या करंजियांनी मोरारजीभाईंना चक्कच सांगून टाकले आहे की, देश किंवा चिरंजीव यापैकी एकाची निवड करा. अर्थात एवढया निकरावर येऊन बोलावे एवढ्या प्रकर्षाने कांतिभाई कार्य करत नाहीत. तथापि पहिला अनुभव अतिकडवट असल्याने आता आपले ताकसुद्धा फुंकून प्यायचे इतकेच. त्यात सुदैवाची गोष्ट अशी की, बाळ संजयचे वर्तन आणि त्याचे भयावह परिणाम– कांतिभाईंच्या डोळ्यांसमोर आहेत आणि त्यांची उमर पन्नाशीच्या पुढे असल्याने तरुणाची तडफ त्यांच्याजवळ नाही, त्यामुळे तुर्कमन गेटसारखी मनमानी त्यांच्या हातून होणार नाही. तरी सुद्धा...

मोरारजीभाई पंतप्रधान झाल्यापासून त्यांचे चिरंजीव कांतिभाई हे खाजगी सचिव म्हणून आपल्या पिताजींच्या मागे सावलीसारखे उभे आहेतच. आजवर त्यांनी मुलाखत वगैरे देण्याचे टाळले होते. कोणी पत्रकाराने त्यांच्याबरोबर बातचीत करताना चुकून संजयचा उल्लेख केला आणि त्यांची आणि संजयची तुलना करण्याचा प्रयत्न केला मात्र, कांतिभाई विलक्षण संतापले आणि त्यांनी संबंधित पत्रकाराला हाकलून दिले. तरीही त्यांची एक मुलाखत अलीकडेच प्रसिद्ध झाली आहे.

**प्रश्न :** आपण आपल्या उद्योगव्यवसायाला कधी आणि कसा प्रारंभ केला ?

**उत्तर :** मी काही उद्योगधंदा किंवा व्यवसाय करावा अशी पिताजींची इच्छा नव्हती. मी विमानदलामधील इंजिनिअर व्हावे असे त्यांना वाटे. म्हणून मी टाटा एअरवेज्मध्ये प्रशिक्षण घेऊ लागलो. पुढे तिथे संप झाला आणि या लाइनमध्ये मी नाव काढू शकेन असेही मला वाटेना. म्हणून मी विमाव्यवसायामध्ये जायचे ठरविले. प्रारंभी माझा विचार वडिलांना फारसा पसंत पडला नाही; पण मी त्यांना स्वच्छ सांगून टाकले की, मी जरी कोणताही व्यवसाय केला तरी त्यांच्या सार्वजनिक जीवनामध्ये त्रासदायक ठरतील अथवा त्यांच्या उज्ज्वल प्रतिमेला छेद देतील असा कोणताही प्रकार मी करणार नाही. १९५२ नंतर मी विमाव्यवसायाखेरीज इतर व्यवसाय करण्यासही प्रारंभ केला आणि माझ्या विविध व्यवसायात बऱ्यापैकी यशही मिळविले. अर्थात हे एखाद्या विशिष्ट व्यवसायामधील यश नव्हते. कारण कापडव्यवसायापासून ते पुस्तकप्रकाशनापर्यंतचे अनेक उद्योग मी केले. माझे व्यवसायीन यश पाहून अनेकांना माझ्याबद्दल असूया वाटू लागली. पुढे १९६४ साली घरगुती कारणासाठी माझ्या व्यवसायीन कक्षा मर्यादित करण्याचे मी ठरविले. तरीसुद्धा काही उपद्व्यापी लोकांनी सरकारकडे माझ्याबद्दल नाना स्वरूपाच्या खोटया तक्रारी केल्या.

**प्रश्न :** त्या वेळी सरकारने तुमच्याविरुद्ध काही हालचाल केली काय ? किंवा तुमच्याकडून स्पष्टीकरण वगैरे मागविले काय ?

**उत्तर :** एकदा जवाहरलालजींनी त्याबद्दल माझ्या वडिलांशी बोलणे केले होते. त्यांचे चिटणीस एम्. ओ. मथाई माझ्या वडिलांना एकदा म्हणाले, आपल्या चिरंजिवांशी बोलण्याची इच्छा आहे. त्यांच्याशी बोलण्याची गरज मला भासत नव्हती. तथापि पिताजींनी सांगितले म्हणून मी तयारी दाखविली. मी दिल्लीला असताना मथाई आमच्या घरी आले आणि म्हणाले, 'हे पहा, आपण ज्या विषयावर बोलणार आहोत त्याबद्दल कोणतेही दडपण बाळगू नका.' मी म्हणालो, 'दडपण कशासाठी, मला कसलेच दडपण वाटत नाही आणि गंड वगैरे असलाच तर तो श्रेष्ठतागंड आहे !' मथाई यांनी अशा पद्धतीने बोलणे सुरू केले. कारण बोलणे सुरू करण्यापूर्वी मी घाबरून जावे असे त्यांना वाटत होते. आमची बोलणी झाल्यावर काही दिवसांनी पंतप्रधानांच्या निवासस्थानाहून बोलावणे आले. तिथे मला सांगण्यात आले की, 'माझ्या आर्थिक व्यवहाराबाबत तक्रारी करणारी असंख्य पत्रे आली आहेत.' मी म्हणालो, 'ठीक आहे; पण त्याबाबत मी काय करावे ? आपल्याला आलेल्या पत्रावरून आपल्याला जर असे वाटत असेल की आपले काही चुकले आहे तर आपण माझ्याविरुद्ध कारवाई करू शकता.' त्यावर मथाई म्हणाले की, 'मी व्यापार सोडून देऊन काही विशिष्ट उद्योग करावा.' मी म्हणालो, 'उद्योगधंदा करण्यासाठी किंवा कारखाना वगैरे काढण्यासाठी माझ्याजवळ पैसा नाही आणि समजा मी जरी एखादा सावकार गाठून पैसा उभा केला तरी त्याविरुद्ध तक्रार करण्यात येईल. मग काय करणार ?' मथाईंजवळ काही उत्तर नव्हते. थोडा वेळ थांबून ते म्हणाले, 'तुम्ही एक गोष्ट करू शकता, तुम्ही पिताजींना असे सांगा की, ज्या वेळी ते मुंबईला येतील त्या वेळी त्यांनी स्वतंत्रपणे रहावे आणि तुम्ही जेव्हा दिल्लीमध्ये याल त्या वेळी तुम्ही

त्यांच्याकडे न राहता हॉटेलमध्ये वा अन्यत्र रहावे. या विक्षिप्त सूचनेचा मला राग आला आणि मी त्याचा लगोलग इन्कार केला.

त्यावर मथाई म्हणाले, 'टी. टी. कृष्णाम्माचारीचे उदाहरण पहा, ते मद्रासकडे गेले तर मुलाकडे राहात नाहीत तर हॉटेलमध्ये उतरतात.' मी म्हणालो, 'त्याच्या हॉटेलमध्ये उतरण्याने असा काय मोठा फरक पडतो ? किंवा केवळ त्यामुळेच त्यांचे नाव सतेज राहते असे थोडेच आहे ? समजा, आपण म्हणता ती गोष्ट मी मान्य केली तर त्यानंतर माझ्यावर लोकाकडून टीकाटिप्पणी होणार नाही याची शाश्वती तुम्ही देऊ देऊ शकाल काय ?' या अनुत्तरित प्रश्नानतर मी म्हणालो, 'या उप्पर आलेल्या तक्रारीच्या आधारे माझ्याविरुद्ध काही कारवाई करण्यात आली तर मी न्यायालयात भाडल्याखेरीज रहाणार नाही.'

**प्रश्न :** तुमच्याविरुद्ध करण्यात आलेल्या आरोपाबावत लोकसभेमध्येही तुमचे नाव घेण्यात आले होते. त्याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

**उत्तर :** लोकसभेमध्ये हा विषय निघाला होता आणि माझ्या व्यवसायाबाबत अनेक आरोप करण्यात आले हे खरे आहे. माझ्या काही मित्रानी पुढे मला सांगितले की, माझ्याविरुद्ध जे गरळ ओकण्यात आले त्यामागे नेहरू कुटुबियाचा हात होता.

**प्रश्न :** असे तुमच्या मनात का येते ? तुमच्याविरुद्ध आरोप करणारी मंडळी प्रामुख्याने कम्युनिस्ट आणि सोशालिस्ट होती.

**उत्तर :** विरोधी पक्षाकडूनच माझ्याबाबत आरोप करण्यात आले हे खरे असले तरी त्यामागची प्रेरणा सत्ताधारी असलेल्या नेहरू कुटुबियाचीच होती आणि मला वाटते माझ्या वडिलाबाबत त्याना शोधून कोणताही दोष आढळेना. तेव्हा जवाहरलालजी काय किंवा इंदिराजी काय, या दोघाविरुद्धही ताठपणे उभे राहणाऱ्या, प्रसंगी त्याना विरोध करणाऱ्या माझ्या वडिलाना बदनाम करण्यासाठी त्यानी माझ्याकडे मोर्चा वळविला.

**प्रश्न :** १९६४ साली आपण आपल्या वडिलांचे सहाय्यक म्हणून काम करू लागलात. त्या वेळी विविध उद्योगधंद्यामध्ये असलेले आपले सबंध आपण पूर्णपणे तोडून टाकलेत काय ?

**उत्तर :** होय. मी बहुतेक सर्व सबध तोडून टाकले. तथापि इस्टेट एजटस् या लडनहून काम करणाऱ्या सस्थेचा सल्लागार म्हणून मी काम करीत होतो. तसेच प्रवासी सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या ट्रेड किंग या विख्यात सस्थेचा एक सचालक म्हणूनही मी काम पहात होतो. तथापि या वर्षाच्या प्रारंभी मी पिताजीचा खाजगी चिटणीस म्हणून काम पाहू लागलो आणि तेव्हापासून मी वर उल्लेखिलेल्या सस्थाशी असलेले आर्थिक सबध पूर्णपणे तोडून टाकले.

**प्रश्न :** वर उल्लेखिलेल्या सस्थाखेरीज आपले अन्य कोणत्या संस्थाशी सबध होते ?

**उत्तर :** एका इटालियन संस्थेच्या सहकार्याने मी परमनंट मॅगनेटस् ही सस्था स्थापन केली. या व्यवसायामधील तो पहिलाच महत्त्वपूर्ण प्रयत्न होता. त्याखेरीज डोडसाल्समध्ये मी अर्धवेळ संचालक म्हणून सात वर्षे काम पहात होतो.

**प्रश्न :** त्या वेळी मिळालेल्या निवृत्तिसुविधाबाबत लोकसभेमध्ये अनेक प्रश्न विचारण्यात आले होते...

**उत्तर :** हो, त्याचे काय झाले, माझ्या निवृत्तीनंतर पेन्शनऐवजी पंचाहत्तर हजार रुपयाची रक्कम देण्याचे त्यानी ठरविले. रकमेवरील कराचा बोजा कमी व्हावा म्हणून मी ही रक्कम तीन वर्षांमध्ये विभागून घेतली. यामध्ये बेकायदेशीर असे काहीही नव्हते; पण हा सारा व्यवहार म्हणजे काही तरी भयकर प्रकार आहे, अशा पद्धतीचे चित्र रगविण्यात आले.

**प्रश्न :** आपल्या परदेशदौऱ्याबाबत काय ? त्याचाही उल्लेख लोकसभेमधील चर्चेच्या वेळी झाला होता.

**उत्तर :** मी त्या वेळी तैवान येथे तसेच दक्षिण कोरियामध्ये गेलो होतो. तेथील व्यापारी सस्थानी दिलेल्या आमंत्रणाला प्रतिसाद म्हणून सपूर्ण खाजगी स्वरूपाचा असा हा दौरा मी केला. तथापि त्या देशाबरोबर आपले विशेष राजनैतिक सबध नसल्यामुळे काही लोकांनी माझ्या दौऱ्याबाबत टीकेचा सूर लावला.

**प्रश्न :** या वर्षीही राज्यसभेमध्ये कम्युनिस्ट पक्षीय सदस्याकडून तुमच्या अलीकडील दौऱ्यांवर झालेल्या खर्चाबाबत प्रश्न विचारण्यात आले.

**उत्तर :** माझ्या पिताजीबरोबर केलेल्या या प्रवासाचा सारा खर्च माझा मी केला. वास्तविक पंतप्रधानाचा खाजगी सचिव म्हणून त्यांच्याबरोबर मी शासकीय खर्चानेही जाऊ शकत होतो. खेरीज मी त्यांचा केवळ खासगी चिटणीस नाही, तर त्याना देण्यात येणाऱ्या सुविधाबाबत दक्षता ठेवण्यासाठी आहे मला गमत वाटते ती एका गोष्टीची की, माझ्याबाबत एवढी दक्षता घेणारी ही मडळी—जवारलालजीबरोबर इदिराजीनी जे अनेक दौरे केले त्या वेळी मात्र गप्प होती.

**प्रश्न :** आणीबाणीच्या काळात तुम्ही काय करीत होतात ?

**उत्तर :** आणीबाणी घोषित होण्यापूर्वी माझी काही राजकीय नेत्याबरोबर चर्चा झाली होती. तथापि त्यानतर काही वैयक्तिक कारणासाठी मी परदेश-दौऱ्यावर गेलो होतो. प्रमुख राजकीय नेत्याच्या धरपकडीचे वृत्त मला जिनेव्हा येथे समजले. त्यानतर सप्टेंबरमध्ये मी स्वदेशी आलो. त्यानंतर विविध तुरुगातून, तसेच अन्यत्र एकच राजकीय पक्ष स्थापन करण्याबाबत चर्चा चालू होत्या. त्यामध्ये मी प्रत्यक्ष भाग घेत होतो. मतभेद, गैरसमज दूर करण्याबाबत बराच अवधी गेला; परतु ते दूर झाल्यावर मात्र पक्षएकीकरणास खरी गती आली. आज मागे वळून पहाताना मला असे वाटते की, श्रीमती गाधीनी चार-पाच महिन्यानतर आणीबाणी जर उठविली असती तर विविध राजकीय पक्षाचे एकत्रीकरण करून एकाच पक्षाची निर्मिती करणे शक्य झाले नसते. आणीबाणी लाबत गेली आणि एकच पक्ष निर्माण होण्याच्या प्रक्रियेला गती आली.

**प्रश्न :** पतप्रधानाचे खाजगी सचिव म्हणून तुम्ही नेमके कोणत्या स्वरूपाचे काम करता ?

**उत्तर :** मी प्रामुख्याने राजकीय प्रश्नाबाबत सहाय्य करतो. व्यवस्थापकीय स्वरूपाच्या कामी अन्य मडळी सहाय्य करतात. मी राजकीय नेत्यांच्या गाठीभेटी घेतो आणि विविध प्रश्नावर त्यांच्याबरोबर चर्चा करतो. माझ्या वडिलाना अनेक बाबतीत सहाय्य लागते. तेही काम अर्थात मी करतोच. खेरीज पतप्रधानाना भेटायला

पृष्ठ २३ वर.

# पोटनिवडणुकांचा कौल

## जनता-लाट कायम

**वा. दा. रानडे**

जनमतावर जनता-लाट अजून कायम आहे, हे उत्तरप्रदेश, बिहार, राजस्थान, पंजाब, गुजरात आणि मणिपूरमध्ये लोकसभा व विधानसभेच्या काही जागासाठी झालेल्या पोटनिवडणुकांवरून पुन्हा एकदा दिसून आले. या पोटनिवडणुकांत फक्त गुजरातमधील विधानसभेची एक जागा कांग्रेसला मिळाली.

उत्तर प्रदेशातील जनता पक्षाचे मुख्यमंत्री राम नरेश यादव कांग्रेस उमेदवाराविरुद्ध साडेबत्तीस हजार मताची आघाडी मिळवून आणि बिहारचे मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर पासष्ट हजार मतांची आघाडी मिळवून विजयी झाले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री यादव निधोलीकलात मतदारसंघात उभे होते. जूनमधील निवडणुकीत जनता पक्षाने ही जागा तेरा हजार मतांच्या आघाडीने जिंकली होती. कांग्रेस उमेदवारास पाचव्या क्रमाकाची मते पडली होती. सार्वत्रिक निवडणूक असूनही त्या वेळी मतदान अवघे ४५ टक्के झाले होते व विजयी उमेदवारास ४६ टक्के मते मिळाली होती. पोटनिवडणुकीत मतदान कमी होते हा नेहमीचा अनुभव; पण या वेळी उलटे झाले. या मतदारसंघात ७८ टक्के मतदान झाले. लोकाच्या उत्साहाची त्यावरून कल्पना येते. मतदान जातीय पायावर होईल असा कांग्रेस नेत्याचा आडाखा होता. कांग्रेसचा उमेदवार लोढा राजपूत जमातीचा होता. या जमातीचा क्रम लोकसंख्येच्या दृष्टीने या मतदारसंघात दुसरा लागतो; पण त्याचा फायदा कांग्रेसला मिळाला नाही असे दिसते. जनता पक्षाच्या वीस हजार कार्यकर्त्यांनी जोरदार प्रचारमोहीम केल्याने कांग्रेसच्या जातीय आवाहनाला मतदाराकडून प्रतिसाद मिळाला नाही. प्रत्येक मतदानकेंद्रावर केंद्र ठेवण्याइतके पुरेसे कार्यकर्ते आमच्यापाशी नव्हते हे कांग्रेस-नेतेही मान्य करतात.

वाराणसी येथे झालेल्या शिया-सुनी दंगलीला भडक रूप देऊन जनता पक्षाविषयी मुस्लीम जनमत कलुषित करण्याचा कांग्रेसने प्रयत्न केला होता आणि मुस्लिमाची मते आपल्याला मिळतील असा त्यांचा अंदाज होता; तो खरा ठरला नाही. यादव जमातीचे प्रभुत्व असलेल्या खेड्यामध्ये हरिजनाचा छळ होतो, त्यांच्यात घबराट निर्माण झालेली आहे, असाही त्यांचा प्रचार होता; पण हरिजनावर त्याचा प्रभाव पडला नाही. मुख्य मंत्री यादव याना सर्वच जमातीचा पाठिंबा असल्याचे त्याना मिळालेल्या मोठ्या बहुमतावरून दिसून आले.

मुख्यमंत्री यादव यानी विजय मिळविला खरा; पण जनता पक्षातील घटकात असलेला अंतर्विरोधही लपून राहिला नाही यादव याच्या विजयासाठी भारतीय लोकदल आणि जनसघाच्याच कार्यकर्त्यांनी अतोनात परिश्रम घेतले असे तटस्थ निरीक्षकानाही दिसून आले. संघटना कांग्रेस, लोकशाहीवादी कांग्रेस आणि समाजवादी यांच्यातील कोणीही मोठा नेता मतदारसंघात फिरकला नाही. प्रचार तर राहू द्याच, पण जनता पक्षाच्या खजिनदारपदी असलेल्या सघटना कांग्रेसच्या एका नेत्याने पत्रकारांना दिलेल्या एका मुलाखतीत यादव मत्रिमंडळावर टीका केली. त्यामुळे जनता पक्षाचे प्रचारक अडचणीत आले. तेव्हा मुख्यमंत्री यादव यांनी निवडणूक जिंकली असली तरी पक्षबळकटीच्या दृष्टीने जनता पक्षातील घटकांनी पूर्वीचे पक्ष विसरून एकजुटीने कार्य करायला हवे.

बिहारचे मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर तर पासष्ट हजाराएवढ्या प्रचड मताधिक्याने निवडून आले. जूनमधील निवडणुकीत जनता उमेदवाराने पस्तीस हजाराचे मताधिक्य मिळविले होते. हरिजनांनी मतदान करू नये म्हणून जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्याना दहशत दाखविली असे आरोप कांग्रेसनेते करीत आहेत; पण मुख्यमंत्री ठाकूर यांनी याबाबतीत कांग्रेसजनाना जाहीर आव्हान दिले आहे. या मतदारसंघाला परिचित असलेल्या चार कांग्रेस कार्यकर्त्यांची नावे त्यांनी घेतली. या कार्यकर्त्यांनी लवाद म्हणून निर्णय द्यावा. मत देण्यास एका हरिजनाला जरी मी प्रतिबंध केला असे त्यांनी सिद्ध केले तरी मी राजीनामा देईन, असे ठाकूर यांनी सागितले. वार्ताहराना ते म्हणाले, 'माझ्या निवडणूकमोहिमेत हरिजनाचा वाटा मोठा होता. गेली तीस वर्षे मला हा मतदारसघ परिचित आहे. जात न पाहता मतदारांनी मला मते दिली व ती एवढ्या मोठ्या संख्येने की, माझ्या सर्व प्रतिस्पर्ध्यांच्या अनामत रकमा जप्त झाल्या!' तर निराधार आरोप करीत बसण्यापेक्षा कांग्रेस कार्यकर्त्यांनी ठाकूर याचे हे आव्हान स्वीकारून सिद्ध करून दाखवावे.

### केरळमध्ये हादरा

पोटनिवडणुका कांग्रेस हरली तर केरळमध्ये सत्तारूढ आघाडीच्या दोन मंत्र्यांची निवडणूक हायकोर्टाने भ्रष्टाचाराच्या आरोपावरून रद्द ठरविली. या दोन मंत्र्यांपैकी एक मुस्लिम लीगचे श्री. कोया व दुसरे केरळ कांग्रेसचे श्री. मणि. यापूर्वी मुस्लीम लीगचे अध्यक्ष सैत यांचीही निवडणूक हायकोर्टाने याच आरोपावरून रद्द केली. या निकालानी सत्तारूढ आघाडीला हादरा दिला आहे. भ्रष्टाचाराचा अवलंब करून आणि सरकारी यत्रणेचा गैरवापर करून आघाडीने निवडणुका जिंकल्या असे आरोप मार्क्सवादी पक्षाने पूर्वी केलेच होते. हायकोर्टाच्या निकालांनी त्यास पुष्टी मिळाली आहे. विधानसभा बरखास्त करून नव्या निवडणुका घ्याव्या अशी मागणी मार्क्सवादी नेते नंबुद्रिपाद यानी केली आहे. पाकिस्तानात भुट्टोच्या पक्षाने बनवाबनवीचे प्रकार करून निवडणुका जिंकल्या. पुढे न्यायालयात त्यातील एकेक निवडणूक रद्द ठरू लागली. विरोधी पक्षानी एकत्र येऊन नव्या निवडणुकांच्या मागणीसाठी आंदोलन उभारले, भुट्टोना त्याची मागणी मान्य करणे भागही पडले; पण पुढे लष्कराने सत्ता हाती घेतली आणि निवडणुका पुन्हा पुढे ढकलल्या गेल्या. नव्या निवडणुकांच्या मागणीसाठी केरळमध्ये मार्क्सवादी पक्ष आंदोलन करण्याचाही सभव आहे. प्रत्येक निवडणुकीबाबत कोर्टात जाऊन निर्णय लावून घेणे ही फार खर्चाची आणि विलबाची बाब आहे. केरळ हायकोर्टाने वरील तीन निवडणुकाबाबत दिलेले निकाल हे चाचणीनिकाल मानले पाहिजेत. शिता-

पृष्ठ १८ वर

कथा

# ठिकऱ्या

## माधव कोंडविलकर

बाबू घुम्याने अंथरुणावर लोळून लोळून एक दिवस गूट केलं. घराचं आढच मोडून पडावं, तसं त्याच्या बायकोला झालं. कपाळावर जोरजोराने बडवून घेत तिने बोंब ठोकली.

'माज्या राज्या रेऽऽ! माज सोडून कसा गेलास रेऽऽ!'

तिच्याबरोबर तिचा मुलगाही किंचाळायला लागला. माय-लेकरांची रडारड ऐकून सगळा वडार भयभीत होऊन धावत सुटला. शेजारणी रामीच्या सुरात सूर मिळवून हुंदकू लागल्या. बायकाच्या रडण्यामुळे पोरी–बाळी टिपं गाळू लागल्या. सगळ्यानी एकच कालवा केला. पुरुष माणसं एकमेकांच्या तोंडाकडे गंभीरपणे पाहात बसली.

रामीच्या डोळ्यांचं पाणी खळत नव्हतं. केशा तिला बिलगून रडत होता. आलेल्या बायकानी हळू हळू डोळे पुसले आणि त्या आपापसात बोलू लागल्या,

'मर्ता मर्ता आज मेला. बायको–पोरास उगड्यावर टाकून गेला.'

'तिनं तरी काय थोडा केलान? खयूचा द्येव म्हून ठेवलान नाय.'

'आनी वसेद-पानी तरी काय थोडा झाला! पन कशास गून म्हून कसा ता आलाच नाय.'

'मेल्यानं कुनी करनीच तसी करून ठेवलेली. वसेद-पान्यास गून पडा नये असी–'

'गरिबाची बायको आनी पोर उघड्यावर पडला. मेल्यान कुनी पन असा घात करू नये. त्येच्या घरावर पडल सेन ती.' मध्येच कुणी तरी शिवी देऊन आपला राग व्यक्त केला.

रामी हमसाहुमशी रडत होती आणि आठवून आठवून म्हणत होती, 'राज्या, तुज्या जिवावर लय सुख खल्ला रेऽऽ! पाच बोटान तू माज कदी दुकवलास नाय रेऽ! आता तुजी रानी उगड्यावर पडली रेऽ!' रामी घोकून घोकून रडत होती, 'तुजा कुनी वऱ्यानं घात केलान रेऽ! आता त्येच्या रांडा-पोरांचा तलपाट कर रेऽ! मेल्या वैऱ्यास चांगला धड्यावर बसव रे! तुज जेनं खेलत्या डावातना उटवलान हाय त्यास तू आता उटव रेऽ!'

रडून रडून तिचा चेहरा म्लान झाला. डोळे सुजले. केस सारे विसकटले. बऱ्याच बायकांनी तिची समजूत घातली; पण तिचं दुःख कमी होत नव्हतं. शेवटी सखू म्हातारीनं तिला मिठी मारून म्हटलं, 'बाय, आता किती रडसील? रडान आता काय परत येनार हाय? आपला नसीब म्हनाचा! व्हतं न्होतं तेवडं सगलं परयत्न करून झालं. द्येवास हवासा झाला म्हनून त्येनं न्हेलान–ता काय आपल्या हातात हाय! आता पोर्ग्याकडं बग आनी डोलं पूस.'

तरी ती रडत होती. कपाळ आपटून घेत होती.

हळू हळू पुरुष माणसं कामाला लागली. दोघानी खोताच्या दुकानावरून कफनाचं साहित्य उधार आणलं. तिघा–चौघानी गावातले ढोल–ताशे जमवले. बाकीचे तरणे गडी लाकडं न्यायला लागले. म्हातारी माणसं बसून तरण्या पोरांना मार्गदर्शन करीत होती. त्यातच कुणी खाकारे काढत होते. कुणी कडकडून जांभया देत होते. कुणी नुसते दाढीवरून हात फिरवीत होते. कुणी बोटं मोडीत होते, तर कुणी मिळेल त्या काडीने दात कोरीत होते.

सगळी तयारी होताच पाच-सहा गड्यानी बाबूला तिरडीवर उचलून ठेवलं आणि तिरडी दोरीने गच्च बांधली. वर फुलं टाकली. गुलाल उधळला. दोघा–तिघानी ढोल–ताशे गळ्यात अडकवले आणि ढुम्‌ढुम् ढुमाक्–ढुम्‌ढुम् ढुमाक् करून वडवू लागले. म्हाताऱ्या अतूने केशाच्या हातात मडकं दिलं. चौघांनी तिरडी उचलून खांद्यावर घेतली आणि टाळ-मृदुगाच्या गजरात बाबूची प्रेतयात्रा निघाली. रामीने पुन्हा जोराचा हंबरडा फोडला. कुणी तरी स्त्रीने तिच्या कपाळावरचा टिळा पुसून टाकला. हातातला हिरवा चुडा फोडला आणि तिला बोडकं केलं. रामीला अकाली रांडपण आलं. तिच्या लग्नाला अवघी आठ–नऊ वर्षं झाली होती. बाबूचा बाप रामीला मागणी टाकायला गेला, तेव्हा देऊबाईताने एवढाच विचार केला होता की, घराणं गरीब असलं, तरी पोरगा बरा आहे. मेहनत करून कुठेही पोट भरील. आपण गरीब तसा आपला पाहुणाही गरीबच असावा. बाबूची स्वतःची जमीन नव्हती. गोठ्यात गुरं नव्हती. मातीच्या व दगडाच्या चार भिंती आणि त्यावर गवताचं साधं छप्पर हाच काय तो निवारा! सारा गाडग्या–मडक्याचा संसार! कुणाची तरी खंडाने किंवा अर्धेलीने शेती कसायची–तीसुद्धा दरसाल दहा जणाच्या हाता–पाया पडून मिळवावी लागत असे. वर्षभर कष्ट करावेत तेव्हा कुठे दहा–बारा मण भात पदरात पडे. त्यातलं अर्धं जमीनदाराच्या घरात जाई. उरलेल्या पाच–सहा मणांत कसे तरी चार महिने जात. मग बाबूला मिळेल ती मोलमजुरी करावी लागे. दिवसभर घाम गाळावा लागे. कुणाची लाकडं फोडून द्यायची. कुणाची झाडं तोडून द्यायची. कुणाचा गडगा घालायचा. कुणाचं कवळ तोडायच–अशी पडतील ती कामं त्याला करावी लागत.

बाबूच्या बापाला म्हातारपणामुळे आता कसलीच काम जमत नव्हती. त्यामुळे सगळा भार एकट्या बाबूवर पडला होता. बाबू अंगाच्या जोरावर सारी कामं करीत असे. लाकडं फोडायला लागला की, दोन दोन तास हातातली कुऱ्हाड खाली ठेवीत नसे. गावातले वाणी इतर कुणाला न बोलावता बाबूलाच बोलावीत. चार-आठ आणे अधिक देऊन त्याच्याकडून हवं तसं काम करून घेत. बाबूसारखं काम करणारा गावात दुसरा

कोणी गडी नव्हता. कामाला लागला की; जिवाची पर्वा न करता वाघासारखं फुलून काम करायचा. दिवसभर राबत राहायला त्यालाही बरं वाटे.

अधून-मधून रामीही मोलमजुरीला जाऊ लागली. एक–दीड रुपया मिळवून नवऱ्याच्या कमाईत भर टाकू लागली. हा हा म्हणता दिवस जात होते. दोघांनाही कष्टाची सवय झाली होती. एखाद्या दिवशी एकादशी–अमावास्येला काम करायचं नाही, म्हणून घरी बसावं लागलं तर त्यांना चुकल्याचुकल्यासारखं वाटायचं.

म्हातान्याला वर्ष झालं आणि त्यांना मुलगा झाला. दोघानाही आकाश ठेंगणं झाल्यासारखं वाटलं. कामाला येईन या बोलीवर त्याने पाचवीसाठी खोताच्या दुकानावरून उधार जिन्नस आणि पाच रुपये उचल घेतली. लाज्याच्या बाजारातून पोरासाठी अंगडं–टोपरं आणलं.

बारशाच्या वेळी रामी त्याला म्हणाली, 'आता जास्ती खर्च करू नका. आता उदार-उसनवार आन्तीव, पन फुडं फेडताना आप्ल्या नाकी नौ येतील.'

'देवाच्या दयेनं आपनास पोर्गा झाला. करज काय, आज उद्या फेडू.' रामीची समजूत घालून त्याने बारशालाही पाच–पंचवीस रुपये कर्ज काढलं आणि गावकऱ्याना बोलावून त्यांना जेवायला वाढलं. वर्षाच्या आत आपला बाप आपल्या पोटी जन्मास आला म्हणून त्याने बापाचंच नाव आपल्या मुलाला ठेवलं.

बाबू अधिक जोमानं आता काम करू लागला. पोरासाठी आणि बायकोसाठी अधिकाधिक कष्ट उपसू लागला. गावात हातभट्ट्यांचे अनेक धंदे होते. बरोबरचे गडी संध्याकाळी न चुकता नवटाक-पावशेर मारून येत. अधूनमधून बाबूला थोडीशी घेण्याचा ते आग्रह करीत. सुरवातीला तो साफ नकार देई, परंतु पुढे पुढे तोही थोडी घेऊ लागला. थकलेल्या शरीराला जरा बर वाटे. रात्री झोपही छान येई आणि यातूनच त्याचं व्यसन वाढत गेलं. त्याला आता रोज नवटाक–पावशेर लागू लागली. कधी कधी जास्तही होऊ लागली. चालताता तोल जाऊ लागला.

एकदा वारकू भाटकराने उधारीबद्दल विचारलं म्हणून तो त्याच्यावरच उलटला. हातवारे करून लटपटत म्हणाला, 'भडव्या–म्हायती हाय्स पैसेवाला तो! साल्या पान्याचा पैसा कर्तोस–तुजा वाटोला व्हयल!' मग तो तरी काय गप्प बसणार! भाटकराने त्याची मानगुटच पकडली, 'साल्या बदमाश! तुजा कोथलाच बाहेर काढतो आता!' असं म्हणून तो बाबूच्या पोटावर बसला शेवटी लोकांनी त्याला बाजूला केलं. नाही तर त्या दिवशी बाबूचा प्राणच जायचा!

गावात अनेक ठिकाणी धंदे होते. बाबूने दुसऱ्या धंदेवाल्याला धरलं. सगळीकडे उधारी थकत होती. एके दिवशी बाबू खूप प्याला. नीट चालताही येत नव्हतं सोबतीचे सारे गडी पुढे सटकले. चालता चालता त्याचा पाय दरडीवरून घसरला आणि तो धाडकन घळीत पडला. हाता-पायाना आणि छातीला जबर मार लागला. तोंडातून रक्त वाहू लागलं. कुणाची तरी नजर गेली, म्हणून कळलं. तशी रामी कपाळावर हात मारीत धावत गेली. दोघा-चौघांनी बाबूला उचलून घरी आणलं. रामीने मार लागलेल्या भागाला हळद-तुरटी तेलात गरम करून लावली. जो जे सागेल ते ते औषध ती करू लागली. नवऱ्यासाठी वणवण भटकू लागली. भगताच्या, गुरव–घाडयाच्या हातापाया पडू लागली. तिला सारखं वाटायच, नवरा आज बरा होईल, उद्या बरा होईल. नवऱ्यासाठी ती जिवाची पर्वा न करता धडपडू लागली. काबाडकष्ट उपसू लागली. कोणी तरी सागितलं, डॉरटरकडं ने. म्हणून तिने घरातला एकुलता एक हंडा खोताकडे गहाण ठेवून त्यावर दहा रुपये काढून नवऱ्याला डॉक्टरकडं नेलं. अनेक ठिकाणी कर्ज करून ठेवलं. तिला वाटायच, नवरा बरा झाला म्हणजे सर्व कर्ज फेडील. पुन्हा आपल्याला चागले दिवस येतील; पण बाबूला काही बरं वाटलं नाही त्याने अंथरूण धरलं ते कायमचं. रामीला अकाली रांडपण आलं. केशा पोरका झाला. त्याच्यावर जीव ठेवून ती दिवस ढकलू लागली. त्याच्यासाठी काबाडकष्ट करू लागली. एकदा तिचा भाऊ म्हणाला, 'बायो, आता तुजा कसा होणार? एकटा बायल माणूस तू पोर्गा हा लहान-तवा माज आपला वाटता-दुसरा घर करनं बरा! आमचा तरी काय न्हेमी हात पुरनार हाय?'

रामी पोराला पोटाशी धरीत म्हणाली, 'दादा, येवडा फकस्त म्हना नुको. काय व्हयल ता जायल-पन पोरास असा मी वाऱ्यावर टाकनार नाय! तुमच्यावर माजा काय रुसवा नाय. ज्येचा नसीब त्येच्या बरोबर! तुमी काळजी करू नुका!'

केशाला तिने शाळेत घातलं. वामन खोताची अलका त्याच्याबरोबर शाळेत होती. दोघं एकाच वयाची. पण अलका अगापिडाने भरलेली.

अख्ख्या गावात वामन खोताचं एकटं घर खाऊन-पिऊन सुखी होतं. त्याची शेती-वाडी पुष्कळ होती. गुरांनी भरलेला गोठा. दुधा-तुपाची चंगळ! शिवाय गावात त्याचच एक किराणा मालाचं दुकान होतं. खोताला सारं पुरून उरेल एवढं होतं; पण वामन्या अगदी चिक्कू मारवाडी. चमडी देईल पण दमडी न सोडणारा! सारं गाव त्याच्या हातात असल्यासारखं होतं. अडल्या-नडल्यास, साऱ्याना त्याच्याचपुढे हात पसरावे लागत.

केशव आणि अलका एकत्र खेळत. एकत्र बसून अभ्यास करीत. कधी भांडत-पुन्हा एक होत; पण वामन खोताला हे पाहावत नसे. तो पोरीला म्हणे, अगो, त्या कुळवाड्याच्या पोराबरोबर का खेळतेस? भडवा, दारुड्याचा पोर तो! बाप दारू पिऊन मेला-तसा हा सुद्धा मरायचा. कुळवाड्याना कुठली आलीय अक्कल!'

'बाबा, केशव तसा नाहीय. अभ्यासात तो किती हुशार आहे, वर्गात त्याचा नेहमी पहिला नबर असतो!' अलका बापाला म्हणे.

एकदा पोरं खेळत होती. ती बाहुली झाली. तो बाहुला झाला. बाहुला बाहुलीचा संसार! त्यान लहान लहान दगडाची चूल केली. तिने काटक्या जमविल्या. नळ्याची खापरी चुलीवर ठेवून त्यावर मातीच्या पिठाच्या भाकरी भाजल्या. रेतीचा भात केला. पानांची भाजी केली. जेवण तयार झाल. केशवने पत्रावळ्या लावल्या, तिने जेवायला वाढलं. तो आवडीनं जेवू लागला. ती पुन्हा पुन्हा आग्रह करून वाढू लागली. सगळं खोटं खोटं.

एकदा दोघं अभ्यास करीत होती. भूगोलाचे प्रश्न सोडवीत होती. 'पंजाबला गव्हाचे

कोठार का म्हणतात ? सांग ना रे केशव !' अलका केशवला म्हणाली.

'अग, तिथं गहू भरपूर पिकतो.'

'आपली घरं तिथं हवी होती नाही रे ! मग किती मजा आली असती ! रोज गव्हाच्या पोळ्या ! आपल्याला बुवा रोज रोज भात खाऊन कंटाळा आला. कोकणी आणि भातबोकणी !'

केशव काही बोलला नाही. त्याच्या पोटात नळ वाजल्याचा आवाज झाला. तो नुसतं तिच्याकडे पाहात राहिला.

'का रे बोलत नाहीस ? रागवलास ?' ती जवळीक दाखवीत म्हणाली.

'नाही ग, असाच !' पोट चोळीत तो म्हणाला. आणि दप्तर गुंडाळून उठला. 'मी जातो. आई आली असेल. शोधीत राहील.'

केशवला खूप भूक लागली होती. रिकामं पोट सारखं कुटकुटत होतं. घरी येताच तो आईला म्हणाला, 'आये, माज भूक लागल्याय.' आणि तो तिच्या तोंडाकडे आशेने पाहात राहिला.

रामी नुकतीच कामावरून आली होती. कपाळावरचा घाम पदराने पुशीत ती लेकाला जवळ घेत म्हणाली, 'शाना माजा बावा ! माज्या लाडक्यास भूक लागली. कर्ता हा लौकर. तवसर तू दलाप घेऊन ये. मी तांदूल निवडता आनी भात घालता.' असं म्हणून तिने पायलीभर कोंड्यात पसाभर नाचणी घालून पिशवी केशवकडे दिली.

कोंडा हाताने चाचपीत केशव आईला म्हणाला, 'आये, इतका जाड कुंडा कशास गे घेतेस ? गिरनीत टाकताना खोत नेमी वैतागतो. म्हंतो 'आमच्या म्हसीपन अस्ला खाना खावच्या नायत. जरा बारीक आनूचा.'

'त्येच्या रांडेची......' तिच्या ओठावर कचकचीत शिवी आली होती पण तिने ओठ गचकन दाबले. ती एवढंच म्हणाली,

'बावा, काय करनार ? त्येच्यासारखा आपून काय सिरीमंत हायत ! आपल्या नसीबात व्हता ता घेवास बगावला नाय. जा लौकर, उसीर व्हयल.'

केशव गिरणीवर गेला तेव्हा अलका नवा परकर-पोलका घालून अंगणात खेळत होती.

'केशव, येतोस का रे खेळायला ?' त्याच्याकडे पाहात ती म्हणाली,

'नाही. उशीर होईल,' असं म्हणन तो पटकन पुढे सटकला. तो मनात म्हणू लागला, आपण जर मुलगी असतो तर बरं झालं झालं असतं. अलकाचे जुनेपाने कपडे आपल्याला मागता आले असते.

जेवताना तो आईला म्हणाला, 'आये, आपनास जमीन कशी नाय गे ?' त्याला माहीत होतं, आई आपली दुसऱ्याकडे पैरी जाते. दुसऱ्याच्या शेतात काम करते.

'बावा, आपनास खयची जमीन! जरासा तुकडा व्हता ता पन मेल्याल्या घशात पडला !'

'आये, अल्का म्हंते, भात खाऊन खाऊन कंटाळा येतो. त्यांच्याकडे कुठली ग एवढी जमीन ?'

'बावा, काय कराचाय आपनास ? म्हंतात ना, मोटा ता खोटा ! अशाच सगल्यांच्या जमनी घशाखाली घालून घेतलात ! आणि आता झाला गबर.' केशवने पुढे काही विचारू नये म्हणून ती म्हणाली, 'जेव आनी झोप. दुसऱ्याच्या उठाठेवी काय करुच्यात आपनास ? आपला पॉट कसा भरता ता बगुचा.' आईच्या सांगण्याप्रमाणे जेवून होताच केशव पटकन झोपला. थोड्या वेळाने तीही त्याच्या बाजूला पटकुरावर पडली. पण बराच वेळ तिला झोप काही लागेना. आपल्या पोराचं कसं होईल, ही एकच काळजी तिला रात्रं-दिवस लागली होती. गेल्या दोन अडीच वर्षात तिला स्वतःला नवं लुगडं घेता आलं नव्हतं. केशवला कपडे शिवता आले नव्हते. अलीकडे मजुरीलासुद्धा फारसं कोणी बोलावीत नव्हतं. गावात अनेक लोकांचं उसनं आणलेलं द्यायचं राहिलं होतं. खोताला तर तोंड दाखवायला नको, इतकी त्याची उधारी झाली होती. घरातलं सारं धान्य संपत आलं होतं. पैसेही शिल्लक नव्हते. विकण्यासारखं किंवा गहाण ठेवण्यासारखं भांडंसुद्धा घरात राहिलं नव्हतं. विचार करून करून तिचं डोकं दुखू लागलं. बऱ्याच वेळाने तिचा डोळा लागला.

सकाळी झाडलोट केल्यावर ती खोताकडे गेली. वामन खोत झोपाळ्यावर बसून झोके घेत होता. रामी भीत भीत दाराच्या कोप-



न्यात जाऊन बसली. डोकीवरचा पदर सारखा करीत हळू आवाजात ती म्हणाली, 'खोतानु, तुमचं लय उपकार व्हतायत.'

'तुला आजच कशी काय उपकाराची आठवण झाली?' खोत छद्मीपणे हसत म्हणाला.

'नाय...पोर्ग्याचं तेला-पान्याचं हाल आलायत–म्हनून म्हटला काय तरी उदार मागास...' एवढं बोलून ती थाबली. पुढचं तिला बोलवेना.

'अगो, तुला उधार द्यायचं तरी किती?' खोत दरडावून तिला म्हणाला, 'याच्या पूर्वीची उधारी किती आहे ती तुला ठाऊक आहे ना?'

'कामास लागला का देन.' रामी चाचरत म्हणाली.

'अगो, तू नेहमी असेच म्हणतेस. चार दिवसांनी देईन. आठ दिवसांनी देईन. अगो, नवऱ्याचे कफन उधार नेलीस ती अजून देते आहेस. आता विषय आला म्हणून बोललो.' नवऱ्याच्या आठवणीने तिला हुंदका आला. पण खोत रागवेल म्हणून तिने डोळे पदराने पुशीत आलेले कढ आतल्या आत दाबले आणि धीर करून ती पुन्हा म्हणाली,

'माजा पोर्गा मोटा होव दे. मग तुमचं उपकार तो फेडल्याशिवाय ऱ्हायचा नाय!'

'तू नेहमी असेच म्हणतेस.'

'नाय–या येलंस म्हेरबानी करा.' ती गयावया करून म्हणाली. बराच वेळ खोत काही बोलला नाही. मग कुठे तरी पाहात म्हणाला.

'हे बघ, तुला आता गरजच असेल तर असं कर. तुझंही काम होईल. माझं तसं काही अडलेलं नाही. पण तू म्हणतेस म्हणून सांगतो. केवळ तुझ्या शब्दासाठी मला नाही म्हणवत नाही नाही तर मी कोणाला दारातसुद्धा उभं केलं नसतं.' खोत असा एकाएकी नरम झालेला पाहून रामीला धीर आला. ती म्हणाली, 'काय म्हंताव?'

'माझं तसं काही अडलेलं नाही, पण तू म्हणतेस म्हणून म्हणतो.' खोत आढेवेढे घेऊ लागला.

'काय ता?'

'आता तुझे हे असे हाल, त्या पोराचे हाल. अंगावर कपडा नाही. अन्न मिळत नाही. अशा परिस्थितीत तू त्याला किती शिकवणार? अगो, काय आहे, पोटाला तरी आधी मिळालं पाहिजे. मग सारं काही. तुमच्याबद्दल मला काळजी आहे म्हणून म्हणतो. नाही तर मला हे बोलायचं कारण नव्हतं.'

'तुम्ही काय म्हंताव–माज काय कल्ला नाय.'

'अगो–एवढं सांगून तुज कळत नाही. केशाला माझ्याकडं कामास ठेव. त्याचंपण पोट भरेल. तुजपण आधार होईल. आता शिकून तो किती शिकणार आहे?'

'खोतानू, त्येची साला सिकाची लय हौस हाय!'

'अगो, नुस्ती हौस असून उपयोग काय? आपली कुवत बघायला नुको काय? तो म्हणेल, मी डॉक्टर होईन. पण तुला ते परवडणार आहे का? आपलं नाही आधी पोट भरत. मग शिक्षणाच्या गप्पा हव्यात कशाला? एक माझ्या पोरीन म्हटल तर ते जमण्यासारख आहे मी तिला वाटेल तेवढं शिक्षण देऊ शकतो. पण तेच तुला जमणार आहे का? असं तुला उधार रोज रोज कोण देईल? की उपाशी राहून तू त्याला शिकवणार आहेस? माझं पटत असेल तर बघ. नाही तर राहिलं. माझं काय तसं आताच आडलेलं नाही. हे मी तुला आधीच सागितलं.'

'तसा न्हव. माजी काय इच्छा व्हती, त्यास मी सातवीपर्यंत तरी शिकवीन–म्हनू म्हता. मी कामास आला तर?'

'अगो, तू कशास? तुज्यात आता काय दम ऱ्हायलाय?' खोत पुन्हा छद्मीपणे म्हणाला.

चिखलात रुतलेली गाय अधिकाधिक चिखलात रुतावी तशी रामीची स्थिती झाली होती. किती पटवून दिलं तरी खोताला पटण्यासारखं नव्हत आणि खोताला नाही म्हणणंसुद्धा तिला जड झालं होतं.

'आता विचार कसला करतेस? जा. काय हवं ते घे!' असं म्हणून खोत नोकराला म्हणाला, 'अरे, हिला काय काय हवं ते दे!'

रामी निमूटपणे उठली आणि पदर पसरून उभी राहिली. गोठ्यात दाव्याला बांधलेल्या गाईने फुड्यात पडेल ते खावं, काही चांगलं वाईट म्हणू नये तशी रामीची स्थिती झाली होती. आलेल्या परिस्थितीला सामोरे जाण्याशिवाय तिच्यापुढे दुसरा मार्ग नव्हता. □




**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये**

## पुस्तके

# पंखपैल

### झपाटणाऱ्या कविता

**का**ळोख आणि दु:ख हीच सामान्यत: आजच्या मराठी कवितेच्या केन्द्रस्थानी असतात. श्री. नरेन्द्र बोडके यांची कविताही ह्याला अपवाद असत नाही. नव्या कवितेतील हे नैराश्य व्यक्तिगत अथवा सामाजिक जाणिवांची एक प्रतिक्रिया म्हणून जन्माला येत असलं तरीही श्री. बोडके यांच्या कवितेचे स्वरूप व्यक्तिनिष्ठच म्हणावं लागेल. 'पखपैल' ह्या त्याचा कविता–संग्रह अशाच काही कवितांचं प्रतिनिधित्व करतो.

ही सारीच कविता दु:खाभोवती फेर धरताना दिसते. *ह्या दु:खांची अभिव्यक्ती देखील* ते अगदी समर्थपणे करताना दिसतात. कधी त्यांची दु:खं आयुष्याच्या फादीला लोंबकळणारी घरटी अससात, तर कधी तीच दु:खं जथ्याजथ्यानं हिंडत हीच घरटी पेटवून देत असतात. सर्वच कविता गभीर आहेत. आत्ममग्न आहेत. ह्यातलं दु:ख देखील व्यक्तिगत अपयशातून आकारलय. म्हणूनच ह्या दु:खाच वर्णन करताना बोडके अगदी सहजपणे लिहून जातात,

'डोळयात माझ्या पराभवांची पाने असलेले हे झाड अगदी सोपे आहे. वेश्येच्या वासनांच्या ओळीसारखे' ह्या पराभवात ह्या कवीच सारं आयुष्य व्यापलंय. हृया दु:खानी त्याला झपाटलंय आणि म्हणूनच तो स्वत:ला हृया प्रदीर्घ काळोखकालीन शोकनाट्याचा नायक म्हणून संबोधतोय.

नरेन्द्र बोडक्यांच्या हृया कवितेत सर्वाधिक जाणवणारी प्रतिमा एका घराची आहे. जणू घर हृया शब्दानंच त्याला कुठे तरी पछाडलय. घराबद्दलची त्यांची भावना ही आत्मीयतेची, प्रेमाची प्रतीक नसून, ती एका उद्ध्वस्त मनोवृत्तीचच प्रतिबिंब आहे. हृयाच *घराला तो कधी तरी पारखा झालाय्* झालाय. बाहेरच्या जगातल्या वाटांना आयुष्य बहाल करून अनार्य झालाय. हृया कवीला नेहमीच प्रश्न पडतो की, घरं अशी उद्ध्वस्त का होतात ? मग तो ह्राच प्रश्न आयुष्यालाच विचारीत रहातो आणि आयुष्यातूनच त्याचं उत्तरही शोधतो.

'घरे उद्ध्वस्त होत नसतात
उद्ध्वस्त होतो ते आपण. घराच्या नावाने' हृयाच उद्ध्वस्त घराच्या आठवणीनं हृयाचं मन ओथंबलंय आणि त्याच मन.-स्थितीतून तो 'एका घराचा मृत्यु' यासारखी कविता लिहितोय. एके काळी हसरं आणि आनंदी असणारं त्याचं ते घर एका अगतिक क्षणी दु:खाच्या लाटेत वाहून गेलंय. मग विरघळूनही गेलंय.

बोडके हृयाची कविता गंभीर तर आशय *सखोल आहे. उत्कृष्ट प्रतिमा–उपमांनी ती* सजलीय. हृया प्रतिमा 'अचानकतेच्या आत्मकेन्द्री रानात,' दूरवरून दरवळत येणारी गाण्याची ओळ, डोहतुडुंब गाणी, अंधाराचं घुगरू, आठवणीचे मोहेंजोदारो हृयासारख्या सकस आणि सरळही आहेत. काळाचं प्रतीकदेखील नरेन्द्र बोडके समर्थपणें वापरताना दिसतात. 'तो' हृया कवितेत ते सांगतात,

अजून तो भेटतो कधीकधी अकस्मात. होत्याचे नव्हते करून टाकतो.

सगळे समजले आहे असे वाटतानाच काहीही समजलेले नसते असे बजावूनही सांगतो.

ह्यातल्या बऱ्याचशा कवितांची प्रकृती गंभीरच असली, गद्यप्राय असली तरी क्वचित प्रसंगी बोडके लयदार रचनाही सहज करताना दिसतात.

'होतो उन्हाचा आरसा
होते सावल्याचे पाणी'

कधी त्यांचे आशय प्रवाही होतात, शब्द हळुवार बनतात आणि बघता बघता ते निसर्गाशी जवळीक साधतात. मग त्यातले *अर्थही लख्खपणे जाणवत जातात.*

'सावल्यांच्या शकुनांना अर्थ
पालवीला आला
टिळा अस्ताच्या शापाचा
माझ्या भाळास लागला'

'अस्ताच्या शापाचा टिळा' भाळावर लावून जगणारा हा कवी सततच आकाशाचा शोध घेत असतो आणि म्हणूनच अपरिहार्यपणे त्याला ह्या शोधातच आपल वर्चस्व गमवावं लागतं. नरेन्द्र बोडके यांची ही कविता म्हणजे एका अस्वस्थ मनाचं तरल चित्रण आहे. त्यातल्या साऱ्याच प्रतिमा एका अज्ञान, अगम्य दु:खानं झपाटल्यायत. नरेन्द्र बोडके याचे शब्द प्रभावी आहेत आणि म्हणूनच पंखपैलमधल्या त्याच्या कविता आपल्यालाही झपाटून टाकतात; तशाच विचारही करायला लावतात.

**–अशोक प्रभाकर डांगे**

पंखपैल
नरेन्द्र बोडके
गोमंतक साहित्य सेवक मंडळ
पृष्ठसंख्या ६७
किंमत पाच रुपये

# आमचे ग्रंथालय

### Papa Hemingway

By : A. E. Hotchaner
Mayflower Books,
Pages 253, LOP.

**मी** अर्नेस्ट हेमिंग्वेविषयी या आधी 'माणूस'च्या अकात लिहिलेच आहे. विसाव्या शतकातील सर्वोत्तम लेखक म्हणून त्याचे नाव 'टाईम' साप्ताहिकात आलेले होते.

हे पुस्तक तसे नवीन नाही; पण गेल्या ४।५ वर्षापासून हे पुस्तक बाजारात दिसतच नव्हते. परवाच मला ते एका दुकानात दिसले. कधी कधी दुर्मिळ पुस्तकासाठी आपण पुष्कळ हिंडतो. चार–सहा महिने जातात; पण मुंबईच्या किंवा पुण्याच्या कोणत्याच दुकानी त्याचा पत्ता लागत नाही. मग आपण थोडे हिरमुसतो. आता काही ते पुस्तक आपल्याला मिळत नाही म्हणून त्याच्यावर पाणी सोडतो आणि मग दोन–चार वर्षांनी पुस्तक अचानक कुठल्या तरी दुकानात

दिसते. मग आनदाने झटकन् ते पुस्तक घेण्यासाठी आपण पुढे सरसावतो. आपल्या आधी परत ते पुस्तक कुणी तरी घेऊन टाकील या भीतीने आपण ते खालीही ठेवीत नाही! निव्वळ पुस्तके दुकानात शोधायला मी किती हजारो तास घालविले असतील, किती हजारो मैल स्कूटर व सायकल चालवली असेल याचा अंदाज काढला तर डोकं चक्रावून जातं. प्रत्येक महिन्याला बजेट हे असतंच. नव्हे, प्रत्येक दिवशी बजेटची बोचरी जाण सतत असतेच. त्यामुळे एकदम खरेदी शक्य नसते आणि कितीही पैसे खिशात खेळत असले तरी चांगली पुस्तके तितकी सहजासहजी गोळा करता येत नाहीत. जे लोक नेहमी पुस्तके खरेदी करीत असतात त्यांना याचा अर्थ कळेल. नेहमी पुस्तके खरेदी करणारा हा अजाणताच एक उत्तम पुस्तकसग्रह करणारा होतो.

२ जुलै १९६१ रोजी हेमिंग्वेनी स्वतःवर गोळी झाडून घेतली हे सर्वश्रुत आहेच. या माणसाला काय कमी होते? त्याला नोबेल प्राईज् मिळाले होते. त्याला पुलित्झर प्राईजही मिळाले होते. आयडँहो सॉट्थ पर्वतात त्याचे अलिशन मकानही होते. येथे फक्त तो हिवाळ्यात शिकारीसाठी येत असे. न्यूयॉर्कमधेही त्याचा एक फ्लॅट होता. त्याच्याकडे गल्फ स्ट्रीममधे मासे पकडण्यासाठी एक वैशिष्ट्यपूर्ण बोट होती. पॅरिसच्या रीझमधे व व्हेनिसच्या ग्रीटीमधे त्याच्यासाठी एक फ्लॅट नेहमी राखून ठेवलेला असे. त्याचे वैवाहिक जीवनही तसे सुखी होते. त्याची प्रकृतीही तशी वाईट नव्हती. त्याला जगभर भरपूर दोस्त व चाहते होते. त्याची उभी हयात जीवन पिण्यास आसुसलेली होती. फार थोड्या लेखकाच्याबाबतीत त्यांचे आयुष्य व त्यांचे साहित्य एकमेकांना पूरक ठरत असते. हेमिंग्वे व त्याचे साहित्य हे दोन जुळे भाऊ होते. हेमिंग्वेचे आयुष्य कोणते व हेमिंग्वेचे साहित्य कोणते यामध्ये अगदी एक पुसटशी रेषाही नव्हती. या असल्या लेखकाने का आत्महत्या करून घ्यावी? कशासाठी?

हॉचनर म्हणतात, याचे खरे उत्तर कुणालाही देता येणार नाही. हॉचनर चौदा वर्षेपर्यंत हेमिंग्वेचा जिगरी दोस्त होता. एकदा 'कॉस्मॉपॉलिटन' या मासिकाने पिकासोला कलेविषयी, हेन्री फोर्डला मोटारविषयी व अर्नेस्ट हेमिंग्वेला साहित्याविषयी लेख लिहिण्याची विनती केली. हेमिंग्वेचा लेख आणण्याचे काम हॉचनरवर सोपविले गेले. या लेखासाठी हेमिंग्वेला, १५००० डॉलर्स (जवळजवळ १,२५००० रु.) कॉस्मॉपॉलिटनने द्यायचे असे ठरले होते. या निमित्ताने हॉचनर व हेमिंग्वेची ओळख झाली. या १४ वर्षांत हॉचनर व हेमिंग्वे यात झालेला संवाद हॉचनरने टेप करून ठेवला आहे. यावरून हॉचनरने ते पुस्तक लिहिले आहे. हेमिंग्वेने आत्महत्या का केली याचे उत्तर देणे हॉचनरलाही अवघड आहे; पण हॉचनर म्हणतो की, हे हेमिंग्वेचे जीवन व मरण जसे घडले तसे मी तपशीलवार सागण्याचा प्रयत्न करीन. लेखकाने अगदी हातचे काही राखून न ठेवता लिहिले पाहिजे हा हेमिंग्वेचाच सल्ला हॉचनरने घेतला.

मी माझे स्वत.चे हेमिंग्वेच्या मृत्यूचे विश्लेषण आधी दिले आहे. त्यामुळे त्यातले काही परत लिहीत नाही व केवळ हॉचनरचेच दृष्टिकोन या लेखात मांडतो. हेमिंग्वेचा जन्म १८९९ मध्ये झाला. १९१८ मध्ये ऑस्ट्रियाशी झालेल्या युद्धात हेमिंग्वे जबर जखमी झाला. हेमिंग्वेने चार वेळा लग्न केले.

### छळगंड

शेवटी शेवटी हेमिंग्वे छळगंडाने इतका पछाडला होता की, त्याचे वर्णन आपल्याला वाचवत नाही. प्रवास करताना त्याच्याकडील प्रचंड सामानाची त्याला इतकी चिंता पडत असे की, त्यामुळे तो हतबल होऊन जाई. आपल्या मोटारीच्या मागे पोलीस आपला पाठलाग करीत आहे, असे उगीचच त्याला वाटे. बँक ऑडिटर्स जेव्हा मध्यरात्री त्याला काम करताना दिसत तेव्हा आपल्याच बँक अकाउंटची तो कसून तपासणी करीत आहे, तसच त्याचा टेलिफोन नेहमीच 'बग' केलेला आहे, असे त्याला वाटे. कधी कधी तर हेमिंग्वेला आपला मित्र हॉचनर हा सुद्धा आपल्याविरुद्ध कट शिजविणाऱ्यापैकी एक आहे, असे वाटे. या शकेमुळे हॉचनर रक्तबंबाळ होई.

एकदा हेमिंग्वे जुगारात चार हजार डॉलर्स जिकला. ज्या देशात त्याने पैसे जिकले तिथे असा कायदा आहे की, जुगारात पैसे जिकले रे जिकले की, त्याची माहिती तेथील अधिकाऱ्यांना द्यावी लागे. हेमिंग्वेने हॉचनरला सांगितले की, ही माहिती तू अधिकाऱ्यांना देऊन ये. अर्थात हॉचनरने तसे केले तरीसुद्धा हेमिंग्वेला संशय येऊ लागला की, ही माहिती पुरवायला उशीर लागला व आता माझ्यामागे सरकारी अधिकारी निश्चितच लागणार.

एकदा तर कहरच झाला. हॉचनरला वाटले की, आपण हेमिंग्वेला शिकारीसाठी घेऊन गेलो तर त्याला बरे वाटेल. शिकार म्हणजे हेमिंग्वेचा अगदी आवडता छंद; परंतु ते शेतात गेले व हेमिंग्वेने पक्षावर बंदूक रोखली व लगेच खाली आणली. 'ही जागा कुणाची आहे? येथे 'ट्रेसपास' केल्यामुळे मलाच कुणी तरी बंदूक मारील. नकोत मला ते घाणेरडे पक्षी!' खरे म्हणजे हॉचनर आदि मंडळींना त्या शेतातील शेतकऱ्याच्या बायकोने पक्षी मारण्याची परवानगी दिली होती; पण हेमिंग्वे पुढे म्हणाला, 'इतक्यात जर तिचा पती आला तर आपण बेकायदा प्रवेश केला म्हणून तो आपल्यावर गोळी झाडणार नाही का?'

एकदा ज्या हॉटेलात दोन विक्रेते खात होते त्याच हॉटेलात हेमिंग्वे, त्याची पत्नी मेरी व हॉचनर खाणे घेण्यास गेले. पुष्कळ दिवसानी मेरी बाहेर जेवण घेत होती. त्यामुळे ती आनदात होती. तिचे जेवण अर्धे झाले तेव्हा हेमिंग्वे एकदम म्हणाला, 'चला आपण बिल देऊन लगेच बाहेर जाऊ.' हॉचनरने 'का?' असा प्रश्न केला असता हेमिंग्वेने त्या दोन विक्रेत्यांकडे तोंड केले व म्हटले, 'FBI माझ्या मागे हात धुऊन लागलीय!' यावर हॉचनरने जाता जाता हॉटेलच्या मालकाला त्या दोन गृहस्थाबद्दल विचारले असता तो मालक म्हणाला, 'हे दोघे मालाचे विक्रेते आहेत व गेल्या ५ वर्षांपासून मी त्यांना ओळखत आहे.' बाहेर जाऊन हॉचनरने ही गोष्ट हेमिंग्वेला सागितली तेव्हा हेमिंग्वे तारस्वरात उत्तरला, 'अर्थात FBI चे लोक वेषातर करणार. ते काय खरोखरच FBI चे लोक म्हणून मिरवतील काय? का व्हायोलिन वाजवणारे म्हणून मिरवतील?'

हे असेच चालू असताना काही दिवसांनंतर हेमिंग्वेला एका मानसरोगतज्ज्ञाला दाखविण्यात आले. त्याने काही औषधे दिली आणि हेमिंग्वेला कार्ल मॅनिनजर या प्रख्यात

मानसिक हॉस्पिटलमध्ये दाखल करावे असे सुचवले; परंतु मानसिक रोगाच्या दवाखान्यात जर हेमिंग्वेला ठेवले तर त्याच्या झालेल्या प्रचंड नावाला कमीपणा येईल, असे हेमिंग्वेच्या चाहत्यांना वाटले. म्हणून जेथे मानसिक व शारीरिक या दोन्ही ट्रीटमेंटस् उपलब्ध आहेत अशा मॅयाँ क्लिनिकमध्ये 'Hemingway is Suffering from hypertention' या निमित्ताखाली त्याला ठेवले गेले. हेमिंग्वेने हॉस्पिटलमध्ये दाखल होताना व्हरनॉन लॉर्ड हे नाव धारण केले ! 'मी स्वतः एक अपयशी कॅथॉलिक आहे व मला एका कॅथॉलिक हॉस्पिटलमध्ये लॉर्ड हे नाव देण्यात आले !' असे हेमिंग्वे म्हणाला. अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशातसुद्धा मानसिक रोगाविषयी किती गैरसमज आहेत ते वाचून आश्चर्य वाटले.

मॅयाँ क्लिनिकमध्ये हेमिंग्वेला अकरा वेळा इलेक्ट्रिक शॉक ट्रीटमेंट ( ECT–Electro Convulsive Therepy ) देण्यात आली. हेमिंग्वेसाठी हे मोठे दिव्यच होते. यानंतर हेमिंग्वे पुष्कळच सुधारला; परंतु त्याच्या खोलीला कुलुप वगैरे लावून ठेवलेले त्याला अजिबात आवडत नसे. 'साधे बोथट हत्यारसुद्धा मला ते जवळ बाळगू देत नाहीत,' अशी तक्रार त्याने हॉचनरजवळ केली.

यानंतर थोड्याच दिवसांनी अर्नेस्ट हेमिंग्वेला मॅयाँ क्लिनिकमधून सोडण्यात आले; पण त्याच्या हॉचनरशी झालेल्या संवादात नेहमी एक प्रकारची निराशेची, हतबलतेची छटा असे. हेमिंग्वेचे चाहते व हॉचनर स्वतः त्याला 'पपा' म्हणून संबोधीत असत.

हॉचनरला येणाऱ्या हेमिंग्वेच्या पत्रात त्याचे हस्ताक्षर अगदी बारीक व इतके जवळ जवळ लिहिलेले असे की, हॉचनरला ते जेमतेम वाचता येई. या पत्रात कुणाची ना कुणाची नेहमी कागाळी असे व त्याच्या आवडत्या कामाचा (लिखाणाचा) त्यात फार कमी उल्लेख असे.

## निष्फळ प्रयत्न

आता परत हेमिंग्वेची मानसिक अवस्था बिघडत चालली होती. म्हणून त्याला आणखीन एकदा मॅयाँ क्लिनिकमध्ये नेण्यासाठी एक खास विमान तयार ठेवण्यात आले; पण हेमिंग्वे तिकडे जाण्यासाठी तयार होईना. मॅयाँ क्लिनिकमध्ये हेमिंग्वेला नेण्यासाठी एक डॉन अँडरसन नावाचा ६ फूट ३ इंच उंच, २०० पौंडांपेक्षा जास्त वजन असलेल्या इसमास बोलावण्यात आले. हेमिंग्वेने शक्कल लढवून डॉन अँडरसनच्या तावडीतून आपली सुटका करून घेतली व स्वत:ला एका खोलीत कोंडून घेतले. त्या खोलीतली रायफल हेमिंग्वेने उचलली व तो काडतूस आत टाकायला लागला. इतक्यात डॉन मागील दारातून आत शिरला व एक मोठा दुर्दैवी प्रसंग तात्पुरता पुढे ढकलला गेला. पुढे ज्या विमानातून त्याला नेण्यात येत होते त्यातून हेमिंग्वेने उडी घेण्याचा प्रयत्न केला; पण परत एकदा डॉन व व्हर्नोननी त्याला कसेबसे आवरले व गुंगीसाठी एक सोडियम अॅमिटलचे इंजेक्शन दिले. यानतर हेमिंग्वे थोडा वेळ गुंगीत राहिला

परंतु दुर्दैवाने त्या विमानाच्या इंजिनमधे बिघाड झाला व विमानाला कॅस्पर येथे उतरविण्यत आले. विमान कसेबसे उतरले व स्थिरावले तोच हेमिंग्वे विमानातून खाली उतरला व त्याने फिरत्या प्रोपेलरकडे झेप घेतली. परत एकदा उंच व तगडा डॉन हेमिंग्वे व प्रोपेलर यांच्या मधे उभा राहिला व त्या दोघाची लठ्ठालठ्ठी सुरू झाली. हेमिंग्वेने डॉनला जवळजवळ फिरत्या प्रोपेलरमधे अजाणता ढकलले; पण डॉन कसाबसा सावरला.

साधारण दोन तासांनी विमान दुरुस्त झाले व हेमिंग्वे वगैरे मंडळींना घेऊन परत एकदा मेयो क्लिनिककडे जाण्यासाठी ते अवकाशात झेपावले. विमानात हेमिंग्वे जणू गाढ झोपी गेला आहे, असे डॉन वगैरे मित्रमंडळीना वाटले. त्यामुळे त्या लोकांनी सुटकेचा उसासा टाकला. तोच हेमिंग्वे उठला व त्याने उडत्या विमानातून उडी घेण्याचा दुसरा प्रयत्न केला; पण तोही निष्फळ


**– SOME NEW TITLES RECEIVED –**

1. **Bliss Was It In That Dawn** – A political memoir )– Minoo Masani — Rs. 30/–
2. **The Savage Day** – ( Thriller )– Jack Higgins — Rs. 14/–
3. **The Last Place God Made** – ( Thriller ) Jack Higgins — Rs. 14/–
4. **The 41rst Thief**– ( political thriller )–Edward A. Pollitz — Rs. 15/–
5. **Star Wars** – ( Cine Story, Best-seller–Science fiction )– George Lucas — Rs. 19/–
6. **Generation of Victors** – ( Best-seller Novel ) Burt Hirshfeld — Rs. 15/–
7. **The Prometheus Crisis** – ( Bestseller–What happens when nuclear powar stations go haywire )– Thomas N. Scortia and Frank M. Robinson — Rs. 18 90
8. **The 'K' Assignment** – ( Best-seller– A novel of political murder )– Leslie Waller — Rs. 10/–
9. **Magic** – ( Best-seller ) – William Goldman — Rs. 16/–
10. **The Light At The Center** – ( On Mysticism ) Bharati Agehanda — Rs. 9·50

* पुस्तकाची किंमत ही रत्नापेक्षा अधिक आहे. कारण रत्ने ही बाहेरून चमकतात; परंतु पुस्तके ही वाचणाऱ्याच्या अंत:करणात चमकत असतात. उत्तमोत्तम साहित्यासाठी आजच 'फिनिक्स' चे सभासद व्हा.

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०

ठरला.

मॅयॉ क्लिनिकमध्ये अर्नेस्टची अवस्था या वेळेला फारशी सुधारली नाही. तिथे त्याला परत (ECT– Electro convulsive Therapy) इलेक्ट्रिक शॉक्स देण्यात आले; पण हेमिंग्वेचा छळगंड ( paranoia ) वाईटच होत गेला. त्याला त्याच्या आर्थिक स्थितीची उगाचच पुष्कळ चिंता पडत असे.

शेवटी शेवटी हेमिंग्वेला काहीच लिखाण करता येईना. त्याच्या मनाच्या स्वयचलित यंत्रणेला ( defence mechanism ) हे अजिबात मानवले नाही. म्हणून त्या स्वयं-चलित यंत्रणेने त्याच्यापुढे obsessions, phobias, delusions वगैरे अनेक प्रकारचा मानसिक गुता आणून ठेवला असे मॅयॉ क्लिनिकच्या डॉक्टरांनी हॉचनरला सागितले. हेमिंग्वेत अचाट शक्ती होती. लिहिण्याची शक्ती, प्रेम करण्याची शक्ती, शिकार करण्याची शक्ती, दारू पिण्याची, खाण्याची शक्ती होती जेव्हा त्याच्यातील या शक्ती हरपल्या तेव्हा त्याला स्वतःलाच त्याचे 'इमेज' बघवेना आणि म्हणूनच त्याच्या स्वयचलित यंत्रणेने त्याच्यापुढे न्यूनगंड, छळगंड, अपराधीगंड असे अनेक गंड उभे केले. एकदा तर हेमिंग्वेने खुद्द आपली बायको मेरी हिला सागितले, 'माझे पैसे घेण्यासाठी तूच मला मॅयॉ क्लिनिकमध्ये पाठविलेस !'

आता हेमिंग्वेचे मन एका अभेद्य कवचात शिरले होते. डॉक्टराना काय किंवा त्याच्या चाहत्याना काय, तिकडे शिरण्याचा कोणताच मार्ग उपलब्ध नव्हता.

### पुसट 'अहं'

नॉर्मल लोकांच्या 'अहं'च्या सीमारेषा ( ego boundaries ) ठसठशीत व रेखीव असतात. मनोरुग्णात या सीमारेषा अत्यंत पुसट होत जातात आणि नंतर मन जिवंत रहायला, उभे रहायला तडफडते. पुसट झालेल्या 'अहं'च्या सीमारेषेबरोबर स्वाभिमानही गळून पडतो आणि मग वास्तवता इतकी प्रखर, इतकी असह्य वाटते की, स्वतः-शीच फसवाफसवी करावी लागते. शरीरात इनफेक्शन लागले की, antibodies पुढे सरसावतात. मनात इन्फेक्शन लागले की, स्वत:ची फसवाफसवी सुरू होते.

अधूनमधून हेमिंग्वे थोडा शुद्धीवर येई. असाच एकदा तो शुद्धीत असताना हॉचनरला म्हणाला, 'माझ्या शर्यतीप्रमाणे जर मला आयुष्य जगता आले नाही तर ते मला नको आहे !'

हॉचनर त्याला कळवळीने म्हणाला, 'थोडे दिवस तरी तू लिखाणाचे विचार बाजूला ठेव ! 'टू हॅव अॅण्ड हॅव नॉट' व 'फॉर हूम द बेल टॉल्स' या दोन पुस्तकांच्या मधे तू १० वर्षांची विश्रांती घेतलीस. आणखीन एकदा तू लिखाणापासून १० वर्षांची सुट्टी घेतलीस; मग आता काय अडचण आहे ?'

'त्या वेळेला मला आत्मविश्वास होता की, मनात येईल तेव्हा मी परत लिहू शकेन; पण आता माझा आत्मविश्वास गेला आहे. मी लिहू शकणार नाही या जाणिवेने मला एक दिवस सुद्धा शतकासारखा वाटतोय !' हेमिंग्वे उत्तरला.

हेमिंग्वेची ही अवस्था वाचून शेवटी तो कधी एकदा आपल्यावर गोळी झाडून घेतो असे वाटते. इतका प्रतिभाशाली लेखक ! त्याचा इतका केविलवाणा अंत ! Que, Sera, Sera. अल मक्तूब, मक्तूब !

शेवटी हेमिंग्वेची दोन प्रसिद्ध वाक्ये आठवतात. एकदा एका पत्रकाराने त्याला विचारले होते, 'साहेब, मृत्यूविषयी तुमच्या काय कल्पना आहेत ?' हेमिंग्वे उत्तरला, 'मृत्यु म्हणजे आणखीन एक सटवी आहे !'

दुसरे म्हणजे हेमिंग्वे नेहमी म्हणत असे, 'माणूस तुम्हाला बेचिराख करता येईल; पण माणसाचा पराभव मात्र तुम्हाला करता येणार नाही !' कदाचित हे शेवटचे वाक्य हेमिंग्वेने त्याच्या ऐन तारुण्यात म्हटले असेल; परंतु नियतीने त्याचा पराभव केला हे कुणी नाकारू शकेल काय ?

—जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी


चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक

प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे

किमत वीस रुपये

प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर

पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

# टेक इट लाइटली

संजीव मंगरूळकर

## पंतप्रधान आणि निसर्गोपचार

खरं तर या विषयावर लिहिण्याची मला इच्छा नव्हती, कारण बाब तशी फालतू आहे. दुर्लक्ष करून सोडून देणं बरं, असं आपल माझं मत होतं. प्रत्येक व्यक्तीला मतस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य आहे या गोष्टीवर माझा अजूनही विश्वास आहे. मग भले अशी किती तरी मत विचित्र, विनोदी का असेनात, कुठल्याही मताचा मी मत म्हणून आदर करतो. अगदी तसाच यथोचित आदर मी याही मताला दिला होता आणि मगच त्याकडे दुर्लक्ष केल होतं; पण याही विषयावर काही तरी लिहावं अशी स्फूर्ती परवापरवाच मला झाली.

म्हणजे त्याची पार्श्वभूमी अशी. गोष्ट आपल्या पंतप्रधानाचीच आहे. नुकतेच ते भारताचे पंतप्रधान झाले तेव्हापासूनची. मोरारजीभाई पंतप्रधान झाले तेव्हा साहजिकच त्याचं सर्वदूर खूपच कौतुक झालं. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूचं गुणगान होऊ लागलं. कट्टर गांधीवादी नेते म्हणून त्यांची प्रतिमा आमच्यासमोर उभी होऊ लागली. त्यांची उद्योगप्रियता, त्याचा विलक्षण करारीपणा, त्याची समर्पणवृत्ती, त्यांची लोकशाहीनिष्ठा......एकूणच हा मनुष्य खूपच आगळावेगळा आहे. खऱ्या कसाचा आहे हे आम्हाला जाणवून चुकलं. तसे मोरारजीभाईमध्ये हे सगळे गुण आहेत हे काही आम्हाला आधी माहीत नव्हतं असं नाही. मोरारजीभाईंच्या सगळ्या गुणांचा सगळ्यानाच पूर्वीपासून परिचय होता. फक्त गंमत एवढीच झाली की अशा गुणांनी युक्त अशी व्यक्ती पंतप्रधानच झाल्यामुळे या गुणांचे मोल वाढले. त्यांचे आम्ही बेधडक कौतुक करू लागलो. कुठेकुठे जमल्यास अनुकरणही करू लागलो आणि हे सगळं काही होता होता पंतप्रधान श्री. मोरारजीभाई देसाई हे आमच्या सार्वजनिक, सामाजिक वगैरे जीवनाचा सर्वोच्च आदर्श बनू लागले.

देशाचा पतप्रधान असणारी व्यक्ती राष्ट्रातील नागरिकांना आदर्शभूत असावी ही प्रोसेस अगदी स्वाभाविक आहे. किंबहुना असच असायला पाहिजे असं माझं प्रामाणिक मत आहे; पण आमची गमत अशी की, आम्ही नेहमीच एक पाऊल पुढे जातो. कुठं थाबावं हे आम्हाला समजत नाही. तसंच काहीसं इथही आम्ही केलं. त्याचं कौतुक करता-करता कुठल्याही क्षेत्रात त्याचच मत ऐकू लागलो. अगदी विनातक्रार पचवू लागलो आणि मग इथं थोडासा घोटाळा झाला.

म्हणजे त्याचं असं आहे की, मोरारजीभाईंचं वय ब्याऐंशी वर्षांचं आहे. तरीही आज त्यांचा उत्साह तरुणाना लाजवील असा आहे त्यांची तडफ, कार्यक्षमता तरुणांप्रमाणेच आहे. तात्पर्य मोरारजीभाई या वयातही मंत्रिमंडळातले सर्वांत तरुण मंत्री वाटतात. आता ही गोष्ट कौतुकास्पद आहे हे नि:संशय, पण या कौतुकातून काही नवीनच गोष्टी जन्म घेऊ लागल्या. मोरारजीभाई शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र, निसर्गोपचार अशासारख्या भिन्नभिन्न गोष्टींवर अधिकारवाणीने बोलू लागले. त्यांच्या या विषयांवर मुलाखती घेतल्या जाऊ लागल्या. त्यांची पारायणं होऊ लागली आणि मोरारजीभाईंची शरीरशास्त्रावरील मते हाही एक आमच्या आदर्शाचा भाग होऊन बसला.

मोरारजीभाईंची या विषयांवरची मते तशी खूपच साधी, सरळ आहेत. ते निसर्गोपचाराचे पुरस्कर्ते आहेत, कुठल्याच औषधावर वगैरे त्याचा विश्वास नाही. ते फक्त फलाहार करतात आणि कुठलाही आजार उपोषणाने बरा करून दाखवितात. ते पतप्रधान झाले, तेव्हा त्यांची याच विषयावर एक मुलाखत घेण्यात आली. आपल्या या दीर्घायुष्याचे, आरोग्याचे रहस्य त्यांनी या मुलाखतीत विशद केले. त्यांत त्यानी उपोषणाच्या आवश्यकतेवर पुरेपूर भर दिला. इथपर्यंत सगळं ठीक झाल. एक मत म्हणून मी त्याचा आदरही केला, पण यापुढचं त्याचं आणखी एक मत लक्षणीय आहे.

ते म्हणतात–कुठलाच आजार हा काही पहिल्यापासून टायफॉइड नसतोच मुळी. तो प्रथम अगदी साधा आजार असतो; पण त्या आजारातही आपण खातो; पथ्ये पाळत नाही तेव्हाच हा साधा आजार वाढून खूप मोठा होतो. त्याचा टाइफॉइड होतो. हे मत लक्षणीय आहे. ते काही फक्त आदर दाखवून सोडण्यासारखे नाही. कारण आजच्या ज्ञात वैद्यकीय ज्ञानात या मतामुळे वेगळीच भर पडण्याची शक्यता आहे. कारण टायफॉइड हा आजार विशिष्ट प्रकारच्या रोगजंतूपासूनच होतो, असे या वैद्यकशास्त्रात सागितले आहे. कुठल्याही आजाराचा वाढून टायफॉइड होण हे प्रकरण खूपच नवीन आहे. यावर नव्याने सशाधन होणे आवश्यक आहे. किमान भारताचे पतप्रधान असं म्हणतात म्हणून तरी या सशोधनाची आज फारच गरज आहे.

मोरारजीभाईंची ही मते ऐकून कुणाला धक्का बसण्याची शक्यता आहे; पण बऱ्याच मडळींनी असे धक्के पचविलेले दिसतात. अगदी आंतरराष्ट्रीय पातळीवरही आज त्यांच्या या मताचा आदर होताना दिसतो.

परवा अशीच एक विलक्षण बातमी वाचनात आली. मोरारजी कुठल्याच औषधोपचाराच्या विरुद्ध असल्याने रोगप्रतिबंधक लस वगैरे टोचणे त्यांच्या खिजगणतीतही नसणार हे ओघानेच आले. इथेही त्यानी आपल्या करारीपणाचे दर्शन नुकतेच घडवले. विदेशगमनाआधी कुठलीच लस टोचून घ्यायला त्यांनी नकार दिला. आपण फलाहार घेतो, नियमित उपोषण करतो त्या अर्थी आपल्याला कुठलाच आजार होणार नाही असा त्याचा दावा, त्यामुळे लस टोचून घेणार नाही, अगदी विदेशात जाणे रहित

झाले तरी चालेल राजकारणाचे मागाहून पाहता येईल. त्यांच्या या हट्टापुढे अखेर विदेशी सरकारानीच नमते घ्यायला सुरुवात केली आहे. त्याना राजकारणाशी कर्तव्य असावे, शरीरकारणाशी नव्हे. त्यानी मोरारजीभाईंच्या शरीरशास्त्राला पाठिंवा दिला. त्याना लस माफ झाली. इतकंच काय, पण क्वारंटाइनही माफ. अशा रीतीने निसर्गोपचाराचाच अंतिम जय झाला.

ही बातमीही तशी अगदी सामान्य आहे. मोरारजीभाईंचे एक मत इतकाच अर्थ त्यातून काढावा. त्याला शास्त्रीय आधार वगैरे देऊ नये ही अपेक्षा; पण परवाच एका वृत्तपत्रात याबाबत एक पत्र वाचनात आले. गंमत वाटली. पत्रलेखक एक डॉक्टर आहे. (कशाचा डॉक्टर हे अर्थातच माहीत नाही.) हे डॉक्टरमहाशय मोरारजीभाईंचे त्याच्या तडफेबद्दल कौतुक करतात आणि म्हणतात, 'मोरारजीनी आज असा आदर्श जनतेसमोर ठेवणे आवश्यक आहे. सुयोग्य व सकस आहार आणि संयमित जीवन यातूनच खरा रोगप्रतिकार होतो. असे असताना लस टोचण्याची जरुरीच काय ?' वगैरे वगैरे. हा त्या पत्राचा सर्वसाधारण आशय आहे; पण हा प्रकार गंभीर आहे. मोरारजीभाईंचे एक मत म्हणून त्याचा अर्थ निराळा; पण त्या मताचेच शास्त्र बनवणे हा प्रकार निराळा आणि निश्चितच गंभीर आहे. यातून बरेच प्रश्न निर्माण होतात एक, सकस आहार हे सर्व आजारांवर अगदी अंतिम आणि परिणामकारक उत्तर आहे का ? दोन–भारतातल्या किती लोकांना असा सकस आहार घेणे शक्य आहे ? मोरारजीभाई जो फलाहार घेतात तो किती सामान्य माणसाना परवडणे शक्य आहे ?

तीन–मोरारजीभाई ब्याऐंशी वर्षांचे आहेत म्हणूनच केवळ त्यांच्या अशा मतांचे शास्त्र बनवावे काय ? कारण मोरारजीभाईंची प्रकृती हे एक मोठेच अभिमानास्पद यश आहे ही वस्तुस्थिती आहे. तसेच ते निसर्गोपचार करतात हीही वस्तुस्थिती आहे; पण यांचा काही कार्यकारणभाव असलाच पाहिजे असे आहे का ?

एक उदाहरण सागतो. चर्चिलला पूर्वी त्याच्या दीर्घायुष्याचे रहस्य विचारले होते. तेव्हा तो म्हणाला, याचे कारण मी सिगरेट पितो. आता चर्चिल दीर्घायुषी होता हे खरे आणि तो सिगरेट भरपूर पीत असे हेही खरे; पण या दोन गोष्टीचा एकमेकाशी काही संबध आहेच असे का मानावे ? सगळे सिगरेट पिऊन दीर्घायुषी होतील का ? मोरारजीभाईंची परिस्थिती थोडीशी अशीच आहे.

फरक फक्त एवढाच की, चर्चिलचे हे उत्तर ऐकून इंग्लंडमध्ये काही सिगरेटचे नवे कारखाने उघडले गेले नाहीत; पण भारतात मात्र निसर्गोपचार केंद्रे आता अगदी राज्याराज्यांत सरकारी मदतीने निघू लागणार असे दिसते.

ह्यामुळेही काही फारसा फरक पडत नाही. फक्त आपल्या लोकाच्या वैचारिक दारिद्र्याची थोडी गंमत वाटते. एक प्रश्न पडतो–मोरारजीभाई देसाई जर पतप्रधान झाले नसते तर निसर्गोपचाराचे काय झाले असते ? ☐

---

## पोटनिवडणुकांचा कौल : पृष्ठ ८ वरून

वरून भाताची परीक्षा या न्यायाने बाकीच्या मतदारसंघातही असेच गैरप्रकार झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. केंद्रसरकारने एक कमिशन नेमून याबाबत चौकशी करावी आणि बऱ्याच ठिकाणी भ्रष्टाचार झाल्याचा प्रथमदर्शनी पुरावा आढळल्यास विधानसभा बरखास्त करून नव्या निवडणुका घेणेच योग्य ठरेल.

निवडणुकीत भ्रष्टाचाराचा अवलंब कसा करण्यात आला याबाबत श्री. मणि याची निवडणूक रद्द करताना केरळ हायकोर्टाचे न्यायमूर्ती एन्. डी. पी. नंबुद्रिपाद यानी व्यक्त केलेला अभिप्राय बोलका आहे. निकालपत्रात ते म्हणतात, श्री. मणि यांना आपल्या यशाची खात्री वाटत होती असे म्हणता येणार नाही. वृत्तपत्रातील बातम्यानी सर्वसामान्य नागरिकाच्याच नव्हे तर बिशपच्याही मनात श्री. मणि याच्या यशाबद्दल शंका निर्माण झाली होती. तेव्हा निवडणूक–प्रचाराचे अधिक प्रभावी मार्ग श्री. मणि शोधीत होते. त्यापैकी एक मार्ग म्हणजे चर्चचा पाठिंबा मिळविणे आणि विरोधकांना इतर उपायानी गप्प बसविणे. काही निर्बंध शिथिल झाले असले तरी आणीबाणी अजून जारी होती. सरकारच्या शस्त्रागारात पोलीस हे सर्वांत अधिक दहशत निर्माण करणारे शस्त्र होते. निवडणुकीच्या काळात श्री. मणि मंत्री होते. आपल्या मतदारसंघातील परिस्थिती आणि आपले पद लक्षात घेता चर्च आणि पोलिस या दोन शक्तींचा ते परिणामकारक उपयोग करू शकत होते. ता. १२ मार्च १९७७ ला बिशप याच्या निवासस्थानी भरलेली सभा आणि तेथे एर्नाकुलमचे सिटी पोलिसकमिशनर जोसेफ थॉमस यानी श्री. मणि यांच्या बाजूने केलेला जोरदार प्रचार यांचा विचार या पार्श्वभूमीवरून केला पाहिजे. श्री. मणि यांनी आपल्या निवडणुकीतील यशाचा संभव वाढविण्यासाठीच जोसेफ थॉमस यांचा उपयोग करून घेतला असे याबाबतच्या पुराव्याची काळजीपूर्वक छाननी केल्यावर आमचे समाधान झाले आहे. लोकप्रतिनिधित्वाचा कायदा कलम १२३ पोटकलम ७ अन्वये हा भ्रष्टाचार असल्याने मणि यांची निवडणूक रद्द करण्यात येत आहे !

निवडणुकातील भ्रष्टाचारांना आळा घालण्याच्या प्रश्नाकडे या निकालांनी पुन्हा एकदा लक्ष वेधले आहे. ☐

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# एकटी मी एकटी

मराठी नाटकात चक्क डबलरोल, हे लक्षात आल्यानतर काय तात्रिक चमत्कार– क्लृप्त्या पहायला लागतील कोण जाणे असं वाटून मी बरीक घाबरलो होतो; पण प्रत्यक्षात तसं काही झाल नाही. महेश-रमेश या दोघा भावांच्या भूमिका कुमार दिघे याच अभिनेत्यानं केलेल्या असल्या तरी तो आपला नावापुरताच डबलरोल म्हणायचा. कारण एक भाऊ मेल्यानंतरच ( मध्ये मेकअप बदलायला पुरेसा वेळ घेऊन ) दुसरा भाऊ प्रवेश करतो.

नाटक रवींद्र भट याचं, तेव्हा भावकोमल काव्यपंक्ती वगैरेंची सुरुवातीपासूनच रेलचेल दिसली असती तरी तयारी ठेवली होती; पण नाही. सुरुवात भलतीच अनपेक्षित झाली. दोघा भावापैकी एकजण (बहुधा रमेश. चूकभूल देणे-घेणे.) सेक्समॅनियाने पछाडलेला. त्यामुळे तो सुरुवातीपासनच 'मी राक्षस आहे, मला बाई हवी ', अशा अर्थाचं काही तरी ओरडत होता. थोडचा थोडचा वेळानं सेटवरचा जिना चढून गॅलरीच्या मध्यावर जाऊन आणि पुरेसा प्रकाश अंगावर घेत घेत तो काव्यमय आणि शिवाय सेक्सी अशी स्वगतेही फेकत होता. ती शैलीदृष्टचा नटसम्राटी खाक्याची आणि आशयदृष्ट्या 'कबुतरी वळणाची' वाटत राहिली. मग कौटुंबिक नाटकात अपरिहार्यच असणारे डॉक्टरकाका आले. त्यांनी रमेशच्या अहिल्यामातेशी त्याच्या त्या कामविकृतीवर चर्चा केली. ती अर्धशास्त्रीय असली तरी 'नाटक अगदीच थिल्लर नाही बरं का' असं कौटुंबिक जिव्हाळ्याच्या ऑडियन्सला वाटावं यासाठी आवश्यकच होती असे दिसले. 'अशा पेशंटला ट्रॅंक्विलायझर्स देऊन झोपून ठेवण हा एक उपाय असतो; पण त्यामुळे त्याचं पुरुषत्वच जाण्याची शक्यता असते,' असं काहीसं एक विधान डॉक्टरकाकांनी केलं. तेव्हा माझ्याबरोबर आलेल्या एका (खऱ्याखुऱ्या) डॉक्टरमित्रानं 'भलतंच काही तरी, हे शक्यच नाही!' अशी कुरकूर सुरू केली. तथापि नाटकाकडे बघण्याचे कलात्मक आणि वैद्यकीय दृष्टिकोन याच्यामधला फरक मध्यंतरातल्या चहाच्या आश्वासनासह त्याला पटवून देण्यात मी यशस्वी ठरलो.

एव्हाना नाटक ऐन भरात आले होते. डॉक्टरकाका हे घरच्यासारखेच, तेव्हा त्याची चंदू आणि वैशाली नावाची गुणी बाळे अहिल्यामाता-रमेशच्या घरी आपल्या घरच्यासारखीच वागडू लागली, तर त्यात नवल वाटण्यासारखे काही नव्हते. शिवाय सेक्स आणि काव्य यांच्याबरोबर नाटकात माफक कॉमेडी असणेही व्यवसायदृष्टचा अत्यावश्यक होते. त्यामुळे श्री. चदू व कु. वैशाली याच्या विनोदांना मी निस्सकोचपणे हसलो. शेजारच्या खत्रुड चेहरा करून बसलेल्या पत्रकार मित्रालाही गुदगुल्या करण्याची धमकी देऊन हसायला लावलं.

रमेशचं लग्न होऊन चि. सौ. कां. वसुमती घरात आली. या निमित्ताने उभयतानीही प्रदीर्घ स्वगते म्हणून घेतली. याद्वारे वसुमतीदेवींनी आपलं माहेर दूर्वांच्या जुडीत आणि तत्सम इतर जुड्यात असल्याचं स्पष्ट केल. श्रीमान रमेश यानी 'मला मादी हवी' याच आक्रोशापर्यंत जाऊन न थाबता ती कशी हवी यासंबधीचा तपशीलही बेडरपणे पुरविला. या पति-पत्नीच्या शरीरसंघर्षातून उद्भवलेल्या तणावामध्ये ( मला वाटत) दुसरा अंक संपत आला असावा. तेवढ्यात अपघाताच्या निमित्ताने रमेश गचकले आणि एखाद्या स्मगलर किंवा हायजॅकरप्रमाणे दिसणारे त्याचे परदेशवासी भाऊ महेश हजर झाले. मग त्याचे आणि वैशालीचे मेतकूट, त्यामुळे महेशलाच रमेश समजणाऱ्या वसुमतीचा तीळपापड असे काही कौटुबिक मसाल्याचे पदार्थ चाखायला मिळाले. तिसऱ्या अंकात वसुमती भ्रमिष्ट झाल्यानं मनोविकृतीची दुसरी केस पहायला मिळून नाटकाला, ज्याला एक प्रकारचे वजन म्हणता येईल असे काही तरी प्राप्त झाले. शिवाय मनोरुग्ण काय, कसे बोलतात हे सर्वसामान्य प्रेक्षकांना माहीत नसल्याचा फायदा घेऊन चमकदार, चटकदार आणि तडकभडक काव्यसुमने गोणीच्या हिशेबाने उधळता आली. 'कळी कधी फुललीच नाही' अशा पालुपदाने युक्त असलेल्या एका खडकाव्याने मेलोड्रामामध्येही खूप वरवरच्या पातळचा असल्याचे दाखवून दिले. नाटकाच्या शेवटी जे काही झाले, त्याचा अर्थ मी, 'वसुमती वेडाच्या भरात वैशालीचा खून करते' असा लावला. चूकभूल देणे घेणे. एकटी मी एकटी म्हणजे बहुधा वसुमतीच असावी असा तर्क करून थिएटर सोडले.

अवघा आनदीआनंद आहे. बरीचशी साच्यातली पात्रं आणि बराचसा साच्याबाहेरचा आशय यांचा काही ताळमेळच कुठे जमत-जुळत नाही. रोहिणी ओक-हट्टगडी (भूमिका-वसुमती) आणि इतर दुय्यम पात्रानी आपापल्या भूमिका ठीक वठविल्या आहेत, तेवढाच काय तो रिलीफ आहे. ज्यांच्यावर अभिनयाची मदार जास्त त्या कुमार दिघे यांनी नको नको होईल इतका, अभिनयच अभिनय करून सोडला आहे. रमेशची विकृती प्रोजेक्ट करण्यासाठी हे गृहस्थ अखंड वेळ संपूर्ण चेहरा या कानापासून पार त्या कानापर्यंत हालवीत असतात. डोळे गरगरा फिरवतात. वखवखल्या जनावरासारखे कराकरा दात खातात. ओठ तर विमानाचे पखे पळविल्यासारखे हलवितात, मुख्य म्हणजे पत्र्यावरून करवत किंवा कौल ओढल्यावर येईल तशा आवजात राक्षसासारखे ओरडतात. भीति वाटते. मध्यतरात भेट झाली असता या सर्व अभिनयसामर्थ्याची जबाबदारी त्यानी दिग्दर्शकाच्या माथी मारली. दिग्दर्शक श्री. भालचद्र पानसे, 'रखेली' फेम. त्यानीही ती जबाबदारी आनंदानं स्वीकारली. म्हणाले, 'माणसातलं जनावर दाखविण्यासाठी मी तसं ॲक्टिंग करायला लावलं. मनातली भूक, वखवख शरीरातही उतरणारच की!' म्हटल असेल बुवा, उतरही असेल. आपल्याला तरी काय ठाऊक. गृहस्थ उत्साही दिसले काय करतील आणि म्हणतील ते खरं. सेटिंग वगैरे झोकात केलय. शिवाय ते सिम्बॉलिक आहे, म्हणाले. म्हणजे मजाच आहे. छान आहे.

सर्वांचे भले होवो.

एकच रुखरुख राहिली. लेखक रवींद्र भट काही भेटले नाहीत. भेटले असते तर बरं झालं असतं. त्याना तेवढं एक बारीक विचारायच होतं. 'त्यानी हे नाटक का लिहिलं?' असं. राहून गेलं. □

हिंदी चित्रपट

# दरिंदा

## एका तिकिटात जादूचे प्रयोग

सदानंद बोरसे

'आइए, आइए, मेहरबानों, कदरदानों, आइए। आज और रोज दोपहर तीन, शाम छः और रात नौ बजे फिल्मी दुनिया के जानेमाने मशहूर जादूगर दरिंदा याने कि योगीदत्त याने कि सुनीलदत्त आपकी खिदमत में अपना छू मंतर पेश करनेवाले है।

देखिए, दिल थाम कर देखिए, पानी पर चलना, जलते अंगारों पर चलना, जहरीले साँप का जहर उतारना, इंडियन रोप ट्रिक और ऐसे कई चमत्कार।'

तर प्रेक्षकहो, यापैकी काही प्रयोग आपल्याला बघायचे आहेत का? नाही? ठीक, मग 'दरिंदा' पाहू नका. हो! बराय, तरी सुद्धा 'दरिंदा' पाहू नका. त्यासाठी प्रामाणिकपणे सांगून जादूचे प्रयोग करणाऱ्या एखाद्या जादूच्या शाळावाल्याच्या प्रयोगाला जा! पैसे सार्थकी लागतील. या सगळ्या जादूच्या प्रयोगांना चित्रपटाचे रूप देण्यासाठी या जादूच्या सागाडधावर कथा नामक मांसाचे गोळे चिकटविले आहेत. त्या गोळ्यानाही प्रेमाच्या त्रिकोणाची शिलाई आल्याने एकूण चित्रपट खायला वातड आणि शरीरालाही (विशेषतः डोके आणि डोळे या अवयवांना) त्रासदायक नव्हे तर अपायकारकच बनला आहे.

'दरिंदा' चे दिग्दर्शक कौशल भारती यांनीच या चित्रपटाची लोळागोळा कथा तयार केली आहे कृष्णा आणि कीर्ती यांचे एकमेकांवर प्रेम असते. दोघाचीही अनुक्रमे वये आठ आणि सात. (कदाचित कमीच पण जास्त नाही.) भारतीय चित्रपटांमुळे प्रेमाची पाळे-मुळे थरांच्याच नव्हे तर वयाच्याही दृष्टी ने समाजात फार खोलवर रुजत चालली आहेत. ('हम किसीसे कम नही' मधील सफल प्रेम हे त्याचे आणखी एक उदाहरण.) तर कृष्णा आणि कीर्तीचे प्रेम आहे, हे कळल्यानतर कीर्तीचा मुलीच्या चारित्र्याची काळजी घेणारा बाप (मदनपुरी) अमीर-गरिबीचा झगडा उभा करतो आणि 'दंड' या त्यातल्या त्यात सोप्या व खात्रीच्या उपायाने कृष्णाचे वाकडे पाऊल सावरू इच्छितो; पण कृष्णाला तर योगीदत्त ते दरिंदा (=खलपुरुष) अशी वाटचाल करायची असते ना! मग एका धबधब्यातून तो एका महान ऋषीकडे पोहोचतो, योगसाधना करून अनेक सिद्धी मिळवितो. त्या बळावर नंतर कीर्तीचा शोध घेण्यासाठी, तिचे प्रेम मिळविण्यासाठी अनेक निष्पाप तरुणीना मृत्यूच्या जाळ्यात ढकलतो. कृष्णाचे एवढे एकनिष्ठ प्रेमाचे प्रयत्न चालू असताना कीर्ती मात्र आरती (परवीन बाबी) बनून-'नवे नाव, नवा प्रियकर' म्हणून-सी. आय. डी. इन्स्पेक्टर राजेशशी (फिरोजखान) प्रेमचेष्टिते करीत असते.अखेर अखिल स्त्रीजातीला दारिद्र्याच्या दारुण संकटातून वाचविण्यासाठी आरती आत्मार्पण करण्यास सिद्ध होते. दरिंदासाहेब 'मुझे तेरा शरीर नही, प्यार चाहिए।' म्हणत आत्महत्या करतात. आरती राजेशकडे जायला मोकळी होते आणि सुटका झालेला प्रेक्षकही पैसे वाया गेले यासाठी पडेल चेहऱ्याने बाहेर पडतो.

आता एवढी फिल्मी कथा म्हटल्यानतर योगीदत्तचे योगसामर्थ्य अंतर्ज्ञानाने कीर्तीचा शोध घेण्यात अपुरे का पडते? नंतरही ते कीर्तीच्या मनात प्रेम उत्पन्न का करू शकत नाही? असल्या आत्यंतिक चिल्लर शंकांना त्यात वाव नाही. या साऱ्यांवर एकच सनातन उत्तर,-'प्यार ही दुनिया की सबसे बडी ताकद है, भगवान को भी इस ताकत के सामने झुकना पडता है।'

'कथानक' या उपऱ्या प्रकाराची लेखक कौशल भारती यांनी अशी वासलात लावल्यानंतर दिग्दर्शक कौशल भारती यानी मूळ कल्पना म्हणजे जादूचे प्रयोग तरी ठाकठीक आणि व्यवस्थित दाखवावेत की नाही? पण छेः, गडघाने अगदी कसे येता बघतो पुढच्या वेळी माझा चित्रपट बघायला, असाच निश्चय केला असावा. योगीदत्त पाण्यावरून चालतो, त्या वेळी पाण्याखाली प्लॅटफॉर्म ठेवला आहे. तो जळत्या निखाऱ्यावरून चालतो, त्या वेळी लावलेले लाल दिवे दिसतात. इंडियन रोप ट्रिकच्या जादूच्या प्रयोगात लहान मुलाची बाहुली आणि आकाशाचा सेट चक्क ओळखू येतो. आता योगीदत्त जिवत साकारण्यासाठी हे प्रयोग खरेखुरे दाखवावेत, असे माझे म्हणणे नाही. (तसे ते कौशल भारतीना दाखविता आले असते तर किती बरे झाले असते. पैसे मिळवायला ते फिल्म लाइनमध्यें तरी आले नसते.) पण हे प्रयोग खोटे आहेत, हे प्रेक्षकाना उघडपणे जाणविण्याइतके खोटे नसावेत. हे तत्र तरी निदान त्यानी एखाद्या जुन्या जाणत्या बाबूभाई मिस्त्रीकडून शिकून घ्यायचे होते.

सुनीलदत्तने योगी, खलपुरुष आणि सच्चा आशिक असे त्याच्या व्यक्तित्वाचे पैलू साकारताना फक्त अनुक्रमे भगवी कफनी, काळा झगा आणि सूट असे तीन पोषाख बदलण्याचे श्रम घेतले आहेत. घोगरा, जाड आवाज, अर्धे वर गेलेले तांबूस डोळे, 'इन्स्पेक्टऽऽर' असे हेल आणि एकसुरातील बोलणे या नेहमीच्या styles सर्व चित्रपटभर कायम ठेवण्याची दक्षता त्याने घेतली आहे. सी. आय. डी. इन्स्पेक्टर राजेश अर्थात फिरोजखान याला सरकार पगार कशासाठी देते, असा एक गहन प्रश्न. (जो बहुतेक फिल्मी हिरो सी आय. डी. इन्स्पेक्टर झाल्यावर पडतो.) केसाळ छाती उघडी टाकणे, 'लडकी काहे की बनी' अशी निरर्थक आरडाओरडा करणे, हिरॉईनभोवती गोडा घोळणे आणि अधूनमधून पोलिसचौकीत फेऱ्या मारणे ही कामे करण्यासाठी सी. आय. डी. इन्स्पेक्टर कशाला हवा? परवीन बाबीनेही वरील सर्व कामांमध्ये हिरोला साथ देण्याचे काम तिने इमानेइतबारे केले आहे. म्हणजे या तिघापेक्षा काही एक्स्ट्रांचे कामही अधिक बरे वाटू लागते.

जाताजाता उल्लेख करावासा वाटतो तो सगीताचा. इंदिवरने गाणी जरी हिंदी चित्रपटाला साजेशी लिहून दिली असली तरी काही गाण्यांमध्ये जान आणण्याचा संगीतकार कल्याणजी आनंदजी यांनी प्रयत्न केला आहे. स्व. मुकेशने गायलेले 'आखिर में

तुम्हें मेरा ही होना होगा' हे गीत आणि महंमद रफीच्या आवाजातील 'तू जो नहीं कोई मेरी' हे गीत, ही दोन्ही गाणी आवाजाचा गोडवा आणि चालीचा साधेपणा यांमुळे लक्षात राहतात. पार्श्वसंगीतामध्ये त्यानी उभारलेले योगीगीदत्तच्या बंगल्याचे गूढ, रहस्यमय वातावरणही प्रसंगाना साजेसे होते. एकूण चित्रपटात सकलकाची कामगिरी अतिशय अवघड झाली असावी. पाहण्यालायक फक्त titles च (कितीही आवश्यक म्हणून) उरत आहेत, हे लक्षात आल्यानतर बिचाऱ्याने संकलन न करताच कात्री खाली ठेवली असावी.

'देखिये, एक महान योगी की कहानी; जिसने मौत पर भी विजय पायी थी, लेकिन जिसका समाजने एक दरिंदा बनाया।' ही जाहिरात ऐकल्यानंतरच चित्रपटात सिद्धि-प्राप्तीच्या नावाखाली भरपूर ट्रिक-सीन्स घेतले जाणार याची कल्पना आली होतीच; पण या योगसाधनेचा कथेसाठी उपयोग झाला नाहीच. उलट भारतीय योगशास्त्राचेच अवमूल्यन केले आहे. योगाचा उद्देश आरोग्य उत्तम राखणे; पण हा अखेरचा उद्देश नाही. मन निर्मल राखणे या उद्देशपूर्तीची ती एक मधली आणि आवश्यक अवस्था आहे. योगामध्ये शारीरिक, मानसिक आणि आत्मिक उन्नयन या चढत्या पायऱ्यांनीच अपेक्षित असते. ज्या योग्याला मृत्यूवरही विजय मिळविण्याची सिद्धी प्राप्त झाली आहे, जगातील एका अवघड रहस्याचा पडदा किलकिला करण्याची संधी व पात्रता मिळाली आहे; तो या पार्थिव जगातील सुख, दु.ख, प्रेम (तेही शारीरिक आणि एका विशिष्ट तरुणीकडूनच मिळावेसे वाटणारे), सूड अशा भावनाच्या पलीकडे जाईल की, त्या भावनांच्या वावटळीत सापडून त्याच्याबरोबर गरगरेल? कौशल भारतीनी योग-सिद्धी, चमत्कार, रहस्य इत्यादींच्या फंदात न पडता अलौकिक योगीदत्त आणि पार्थिव कृष्णा या दोन पैलूमधील तणावे दाखविण्याचा प्रयत्न केला असता तरी चित्रपटाला एक वेगळीच उंची मिळाली असती.

असो. 'दरिंदा' पाहिल्यानंतर मला काही नवीन शोध लागले आहेत.

१. 'गुरु ॐ' असे तुम्ही मोठ्यादा ओरडलात की, तुम्ही superman बनता आणि कोणतीही अशक्य गोष्ट करू शकता. उदाहरणार्थ–आकाशाच्या पोकळीतून निखाऱ्यावर उडी मारणे व जिवंत राहणे.

२. तुमच्या हातून एखादा खून झाला, तर बचावाचे सर्वांत सोपे उत्तर, 'तो मेला नाही, आमच्यात आम्ही त्याला सामावून घेतले आहे.'

३. पोलिओवरील अथवा पंगुत्वावरील सर्वांत सोपा उपाय–गरगर फिरवून हवेत उंच फेकून देणे आणि त्या वेळी तोडाने 'गुरु ॐ' म्हणावयास सांगणे.

४. सर्व तऱ्हेच्या आजारावर व जखमांवर एकमेव व तत्काळ गुणकारी जालीम औषध-योगीदत्तच्या कमंडलूतील पाणी.

वाचकांनी प्रयोग करून पाहावेत व अनुभव कळवावेत. ¤

---

# आशिक हूँ बहारों का

## एका तिकिटात स्वित्झर्लंड–सफर

---

जे. ओमप्रकाश हा 'आ'च्या चक्रात अडकलेला माणूस–आयी मिलन की बेला, आया सावन झूमके, आन मिलो सजना ही त्या चाकोरीची काही चाके. मग 'आ' सोडून 'राजा रानी' द्वारे 'रा'त शिरण्याचा त्यांनी प्रयत्न केला; पण 'रा'ने रात्रीचे तारे दिवसाच दाखविल्यामुळे पुन्हा ते 'आ'कडे वळले. 'आप की कसम' झाल्यानंतर आता हा 'आशिक हूँ बहारों का.'

'आन मिलो सजना' पर्यंत चाकोरीतील चित्रपट पाडून जे. ओमप्रकाश चागला धंदा करीत होते. नंतर 'राजा रानी'त त्यांनी चोर व वेश्या अशा एकदम दोन सामाजिक समस्यावाल्यांना हात घातला. त्यानतर 'आप की कसम'मध्ये भावनिक संघर्षाकडे वळण्याचा प्रयत्न केला; पण 'हे आपले प्रांत नव्हेत' हे लक्षात आल्यामुळे की काय ते पुन्हा आपल्या पूर्वीच्या फॉर्म्युल्याकडे वळले आहेत. अर्थात या वेळी त्यांना हीही भट्टी नीट साधलेली नाही.

ओमप्रकाशजीचा फॉर्म्युला कोणता? त्यांच्या चित्रपदार्थाची कृती अशी–एक चिकणा, चॉकलेटी, लोकप्रिय हिरो घ्यावा. त्याच्याबरोबर एक रसगुल्ल्यासारखी हिरॉइन घ्यावी. दोघाना शक्य तितक्या विविध फॅशनेबल पोषाखांमध्ये निरनिराळ्या वाहनांमधून हिंडवावे. चवीसाठी कौटुंबिक (म्हणजे आई-मुलाचे प्रेम व जावई-सासऱ्याचा संघर्ष) मीठ टाकावे. जीभ पोळणार नाही, पण चमचमीतपणा जाणवेल इतके रहस्यमय खलनायकी तिखट टाकावे. विनोदाचा मसाला भरला की पदार्थ तयार. मग एकदा गोड शेवटचा गोड घास दिला की, प्रेक्षकाला तो खूप आवडतो; असे ओमप्रकाशजीना वाटते. त्याप्रमाणे त्यांनी 'आशिक हूँ बहारों का' बनविला. शिवाय त्याला थोडीशी देशभक्तीची फोडणीही दिली; पण तरीही हा पदार्थ बघवत सुद्धा नाही.

अशोक (राजेश खन्ना) नामे एक तथाकथित हुशार तरुण उच्च शिक्षणासाठी परदेशी जातो. तेथें वीरा (झीनत अमान–तिचे नाव वीणा अथवा मीराही असण्याची शक्यता मी नाकारीत नाही.) नावाच्या श्रीमंत मुलीशी प्रेम जमवतो. आणि भारतात परततो. अशा या अत्यंत साचेबद्ध कथेत मग वीराच्या जायदादीवरच प्रेम करणारा खलनायक विक्रम (डॅनी डेंझोपा) व त्याच्या गॅगची कारस्थाने, वीराचे भारतीयीकरण आणि वीराच्या वडिलाचे (रेहमान) मतपरिवर्तन असा मसाला भरला आहे. मध्येच आपल्या अभ्यासाची आठवण झाल्यावर अशोक एक फुटकळ शोधही लावून टाकतो.

राजेश खन्ना या superstar ने आपल्या असख्य भिकार styles मध्ये मंगोलियन माणसागत डोळे पिचपिचे करून बोलणे अशी एक भर टाकण्याखेरीज या चित्रपटात काही केलेले नाही. झीनत अमानने मध्यतरापर्यंत कपडे उतरविण्याची आणि शरीरप्रदर्शनाची हौस मनसोक्त भागविल्यानंतर मग निरनिराळ्या भारतीय पोशाखामध्ये मिरवून घेतले आहे. तिला भारतीय स्त्री समजावून देणे आणि बनविणे हा या चित्रपटातील अत्यंत विनोदी भाग. भारतीय स्त्रीच्या व्यक्तित्वाची इतकी साधी फोड (म्हणजे डोक्यावरून पदर घेणे व कुंकू लावणे) आजपर्यंत कोणाही प्रतिभावंताला जमली नव्हती.

असरानी आणि प्रीती गांगुली हे जोडपे विनोदनिर्मितीऐवजी डोक्याला वैतागच आणते. सुलोचना, नादिरा, ओमप्रकाश व रेहमान आपापल्या भूमिकांमध्ये ठीक.

'हा चित्रपट त्या देशभक्त डॉक्टर, इंजिनिअर व वैज्ञानिकांना अर्पण केला आहे; जे परदेशात शिक्षण घेऊन आपल्या मातृभूमीची सेवा करण्यासाठी भारतात परतले.' या अर्पणपत्रिकेशी संबंधित केवळ दोन गोष्टी चित्रपटात आहेत. एक राजेश खन्नाचे 'हर इन्सान को दो माँएँ होती हैं, एक वह जिसने उसे जन्म दिया और दूसरी वह धरती जिस पर...' इत्यादी इत्यादी भाषण आणि दुसरे 'हिंदुस्थान जैसी दाल और किसी देश में नही मिलती।' हे ओमप्रकाशचे वाक्य. अन्यथा चित्रपटाचा अर्पणपत्रिकेशी दूरान्वयानेही संबंध नाही.

चित्रपटाचे गीतकार आनंद बक्षी आणि संगीतकार लक्ष्मीकांत प्यारेलाल आहेत, एवढी माहिती दिल्यावर सुज्ञास अधिक सांगणे नलगे. थोडीशी करमणूक करून घेण्यासाठी आणि इंग्रजीचा एक अद्वितीय नमुना म्हणून 'I am in love, you are in love.' हे he, she अशा सर्व इंग्रजी सर्वनामांबरोबर चालविलेले गाणे ऐकावे.

चित्रपटाच्या खाती एकमेव जमेची बाजू म्हणजे व्ही. बाबासाहेब याचे छायाचित्रण. आधीच स्वित्झर्लंडसारखा समृद्ध प्रदेश मिळालेला, त्यात बाबासाहेबांच्या कॅमेऱ्याने शहरी स्वित्झर्लंडचा रेखीवपणा आणि हिरव्या स्वित्झर्लंडची मनोहर दृश्ये जिवंतपणे टिपली आहेत. याला अपवाद फक्त मोटर-शर्यतीचा. त्यातील वेग, thrill काही छायाचित्रणात आढळले नाही. जर सिनेमाच्या तिकिटात स्वित्झर्लंडची सैर करून यायची असेल; तर आणि तरच हा चित्रपट पाहावा. □


प्रकाशनाच्या वाटेवर

# पश्चिमेचे पुत्र

रवींद्र पिंगे

ऑस्कर वाइल्ड
अर्नेस्ट हेमिंग्वे
विन्स्टन चर्चिल
एडगर वॉलेस
......

पश्चिमेच्या या प्रतिभावंतांची
सुंदर व्यक्तिचित्रे

प्रकाशित झाले

# टच

कालच्या
बायसिकल थीव्हज्‌पासून
आजच्या
चोमाना डुडीपर्यंतच्या
पंधरा
देशी–विदेशी
चित्रपटांची
ओळख

अशोक
प्रभाकर
डांगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.
दहा रुपये

## अवती–भवती : पृष्ठ ७ वरून

अवती–भवती : पृष्ठ ७ वरून

येणाऱ्या अनेक प्रकारच्या मंडळींवर माझे बारीक लक्ष असते. उगाच फालतू गोष्टींमध्ये पंतप्रधानांचा वेळ जाऊ नये याबाबत मी दक्षता घेतो.

**प्रश्न :** दैनंदिन कामाबाबत पंतप्रधानांशी आपले कधी मतभेद होतात काय ?

**उत्तर :** नाही. मी त्यांच्याबरोबर एखाद्या विशिष्ट प्रश्नाबाबत तसेच संभाव्य उपाययोजनेबाबत बोलतो. त्यानंतर पंतप्रधान त्यांच्या पद्धतीने निर्णय घेतात. मी त्यांच्याबरोबर चर्चा करीत नाही. त्यामुळे मतभेद होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

**प्रश्न :** व्यक्तिगत आवडी-निवडीबाबत, सवयींबाबत तुमचे तुमच्या वडिलांशी कितपत साम्य आहे ?

**उत्तर :** तत्त्वांबाबत किंवा व्यक्तिगत चरित्राबाबत मी त्यांच्याइतकाच काटेकोर आहे. संपूर्ण दारूबंदीच्या धोरणावर माझा पूर्ण विश्वास आहे. मी चहा पीत नाही अथवा सिगरेटही ओढीत नाही. हां,– एक गोष्ट मात्र अशी आहे की, जी माझ्या वडिलांना कदाचित् रुचणार नाही आणि ती गोष्ट म्हणजे मांसाहार. मी अधूनमधून हा आहार घेतो. निसर्गोपचार आणि आयुर्वेदिक औषधे या गोष्टींवर माझा त्यांच्याइतकाच विश्वास आहे.

**प्रश्न :** माजी पंतप्रधानांचे चिरंजीव आणि तुम्ही यामध्ये नेमका फरक कोणता ?

**उत्तर :** संजय गांधी आणि मी याच्यात तुलनाच होऊ शकत नाही. लोकांनी अशी तुलना करणे अन्यायकारक आहे. संजय जवळजवळ माझ्या मुलाच्या वयाचा आहे. माझी उमर आज बावन्न वर्षांची आहे आणि माझ्या पदरी उदड अनुभव आहे. माझी आणि संजय गांधी यांची तुलना करणाऱ्या एका पत्रकारावर चिडून मी त्याची हकालपट्टी केली होती. ' न्यूजवीक 'मध्ये हे वृत्त प्रसिद्ध झाले होते. तथापि त्यांनी तपशीलवार वृत्त दिल्याने मला समाधान वाटले.

**प्रश्न :** एखादा मोटारकारखाना काढावा, असे तुम्हाला कधी वाटले नाही काय ?

**उत्तर :** छे हो, मोटार-कारखाना काढायचा म्हटल्यावर जे भांडवल लागते ते माझ्याजवळ नाही. तथापि सहज एक गोष्ट आठवली म्हणून सागतो–१९५६ साली पश्चिम जर्मनीच्या दौऱ्यावर असताना मी एका मोटार-कारखान्याला भेट दिली होती त्यांनी मला कारखाना आस्थापूर्वक दाखवला आणि भारतामध्ये अशाच स्वरूपाचा कारखाना उभारण्याबाबत चर्चा केली. मला असे सांगण्यात आले की, सालिना एक लाख गाड्या तयार करण्याची संधी मिळाली तर बारा हजार रुपयांपर्यंत छोटी गाडी देणे परवडेल. एवढ्या गाड्यांना पुरेशी बाजारपेठ आपल्याकडे उपलब्ध नसल्याने मी या कल्पनेचा पाठपुरावा केला नाही. त्याच वेळी ज्याच्या महत्त्वपूर्ण सुट्या भागांची किंमत केवळ अडीच हजार रुपये आहे, असे एक जर्मन मॉडेल माझ्या पाहण्यात आले. भारतामध्ये त्या गाडीची जुळणी करण्यासाठी आणखी अडीच हजार रुपये लागले असते. पाच–साडेपाच हजार रुपयांपर्यंत ही गाडी रस्त्यावर येऊ शकली असती. आता मला स्वत:ला या विषयामध्ये गोडी असती तर मी देशामधील एका मोठ्या इंजिनिअरिंग व्यवसायाची सूत्रे सांभाळणाऱ्या किर्लोस्कराकडे ही योजना पाठविली असती. त्यातून ते माझे श्वशुर. त्यामुळे मनात असतेच तर गोष्टी लवकर मार्गी लागल्या असत्या; परंतु मला स्वत:ला विशेष गोडी नसल्याने मी ही योजना त्या वेळचे संबंधित खात्याचे मंत्री मनुभाई शहा यांच्यासमोर मांडली. त्यांचे माझे संबंध फारसे चांगले नव्हते. त्यांनी माझी योजना फेटाळून लावली.

**प्रश्न :** आपल्या वडिलांचे खाजगी सचिव म्हणून आपण आपल्या सार्वजनिक जीवनाला प्रारंभ करीत आहोत असे तुम्ही १४ वर्षांपूर्वी सांगितले होते. आपल्या स्वत:च्या राजकीय भवितव्याबद्दल आपल्याला काय वाटते ?

**उत्तर :** आत्ता मी जे काम करतो आहे ते कमी महत्त्वाचे आहे असे मला मुळीच वाटत नाही. सध्या मी अनुभव गोळा करतो आहे. योग्य वेळ आली की मी योग्य जागी असेन ! □

## □ औद्योगिक अशांततेचा भयावह उद्रेक

ही दुर्दैवी घटना घडून तसे काही फार दिवस झालेले नाहीत. याच महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये घडलेली ही एक दुर्दैवी घटना आहे. स्वदेशी कॉटन मिल ही आशियामधील सगळ्यात मोठी कापडगिरणी कानपूरमध्ये आहे. वेळेवर पगार होत नसल्याने गिरणपट्ट्यातील वातावरण चांगलेच तंग होते. तरीही औद्योगिक अशांततेतून उद्भवलेला असा भयावह उद्रेक पाहावयास मिळेल असे मात्र कोणाला वाटले नव्हते. वेळेवर पगार झाले नाहीत म्हणून संतप्त झालेल्या कामगारांनी दिवसाढवळ्या गिरणीचे निर्मिती–नियंत्रक बी. के. अय्यंगर यांना जिवे मारले. इतकेच नाही तर निर्घृणपणे त्यांचे डोळे ओरबाडून काढले गिरणीचे चीफ अकौंटंट आर. पी. शर्मा यांना गजांनी जीव जाईपर्यंत बडवून काढले. ही घटना घडली दिवसाढवळ्या आणि तीही कानपूरसारख्या शहरामध्ये ! शंभर वर्षांहून जुन्या असलेल्या या अवाढव्य गिरणीमधील या रक्तरंजित प्रकाराचे पडसाद साऱ्या देशभर उमटले. अधिकाऱ्यांची हत्या करून या क्रूर कामगारांचे समाधान झाले नाही. त्यांनी अधिकाऱ्यांच्या मृतदेहाचीही पुरेपूर विटंबना केली. अर्थात हा रक्त गोठवणारा प्रकार एकदम घडला अशातला भाग नाही. ऑक्टोबरपासूनच गिरणीतील वातावरण तापत चालले होते. कामगारांचा पगार तुंबला होता आणि आठ हजार कामगार असलेल्या या गिरणीतील वेतनाच्या थकबाकीचा आकडा ३५ लाख रुपयांवर गेला होता. वास्तविक २७ ऑक्टोबरला गिरणीचे चिटणीस के. पी. अगरवाल यांना ज्या पद्धतीने वागविण्यात आले त्यावरून काही बोध घेतला गेला असता तर कदाचित ही शोकांतिका टळली असती; पण तसे होणार नव्हते. २७ ऑक्टोबरच्या ट्रेलरची झलक अशी–त्या दिवशी चिटणीस के. पी. अगरवाल यांच्यावर गिरणीच्या आवारातच हल्ला करण्यात आला. त्यांना लोखंडी सळईने बडविण्यात येऊन पूर्ण नग्न करण्यात आले. गिरणीच्या बॉयलरजवळ असलेल्या कारंजानजीक त्यांना त्या अवस्थेमध्ये उभे करण्यात येऊन त्यांची पुरेपूर निंदानालस्ती करण्यात आली. इतकेच नव्हे तर, ' पगाराची व्यवस्था करण्यात आली नाही तर तुम्हाला नागवेच बॉयलरमध्ये फेकून देऊ ! ' असेही अगरवाल यांना सुनवण्यात आले. अगरवालांभोवती पडलेला हा वेढा पन्नास तास आपली पकड घट्ट ठेवून होता. पन्नास म्हणजे दोन दिवसापेक्षाही जास्त काळ हे लक्षात आले ना ? या पन्नास तासामध्ये मृत्यूच्या छायेत उभ्या असलेल्या त्या अगरवालांची अवस्था काय झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी ! अशी ही भयावह छळणूक चालू असताना गिरणीमधील अथवा बाहेरील कोणीही मायेचा पूत त्यांच्या

मदतीला आला नाही. गिरणीच्या वातावरणामधील दाहकता रोज वाढत असतानाही राज्यसरकार शाळकरी पोरासारखे हाताची घडी आणि तोंडावर बोट ठेवून गप्प बसले होते. पुष्कळ पाठपुरावा केला गेल्यावर लखनौमध्ये थोडीफार हालचाल झाली. गिरणीमधील अडचणीचा निचरा व्हावा म्हणून रिसीव्हर नेमण्याचे अधिकार कानपूरच्या जिल्हा न्यायाधिशाना देण्यात आले. रिसीव्हरमार्फत कामगाराच्या पगाराची व्यवस्था करावी असे सुचविण्यात आले. एल. एन. बात्रा नावाच्या गृहस्थाची रिसीव्हर म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यांच्या हाती चार लाखांची रक्कम सुपूर्द करण्यात आली. गिरणीचे संचालक जयपुरिआ हे तेवढीच रक्कम घालतील असे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर आणखी तेरा लक्ष रुपयाची व्यवस्था करण्यात आली. ही सारी रक्कम कामगारांमध्ये वाटून टाकण्यात आली. कामगारांनी एकच ठेका धरला–सर्व थकबाकी एका रकमेने एका वेळी मिळाली पाहिजे ! ही मागणी पूर्ण न झाल्याने कामगार गरम होते. लहानमोठे खटके रोज उडत होते आणि शासन ढम्म बसून होते. आता काही निष्पाप जीवांचे बळी गेल्यावर हालचाल सुरू झाली असली तरी योग्य वेळी काही केले नाही म्हणून उत्तरप्रदेश शासनावर आणि विशेषत: राज्याचे मजूरमंत्री गणेशदत्त बाजपायी यांच्यावर चौफेर टीका चालू आहे. अर्थात घडलेल्या प्रकाराचे गांभीर्य इतके आहे की, केवळ राज्यपातळीवर होणाऱ्या टीकाटिप्पणीने वातावरण निवण्यासारखे नव्हतेच. देशात सर्वत्र या घटनेबाबत तीव्र प्रतिक्रिया उमटली. लोकसभेमध्येही या प्रश्नाची चर्चा झाली आणि कामगाराचे हे असले घेराओ सहन केले जाणार नाहीत असे आश्वासन केंद्रीय गृहमंत्र्यांना द्यावे लागले. आता जो प्रत्यक्ष प्रकार घडला त्याचा तपशील देतो. या प्रकारामध्ये ज्यांची हत्या झाली त्या अय्यंगार आणि शर्मा याची पहिल्या मजल्यावरील एका खोलीत छळवणूक चालू असतानाच न्यायमूर्ति रामरतन आणि पोलिसअधिकारी के. एन्. राय यांनी प्रवेश केला. प्रचंड निषेधघोषणा आणि दगडफेक याद्वारा त्यांचे स्वागत करण्यात आले. कामगार एका छपरावर जमा झाले होते आणि दगड, विटा, सळया यासारख्या गोष्टींचा त्यांनी पुरेसा साठा केला होता. खेरीज ब्लीचिंगसाठी वापरण्यात येणारे ॲसिडही त्यांनी जवळ ठेवले होते, तर खाली रस्त्यावर जागोजागी अडथळे निर्माण करून ठेवण्यात आले होते. येणाऱ्या पोलिसाची अडवणूक करण्याचा पुरेपूर बंदोबस्त करण्यात आला होता. पोलिस सुपरिटेंडेन्ट के. एन्. राय यांच्यावर झालेल्या दगडफेकीमुळे ते पुरेपूर घायाळ झाले. अनेक पोलिसांना आणि अधिकाऱ्यांनाही मार खावा लागला. लाठीहल्ला, अश्रुधूर हे प्रकार एकदम फुसके बार ठरावेत इतकी गरमी वातावरणात होती. गोळीबाराचा हुकूम देणे अपरिहार्य होते. न्यायमूर्ति रामरतन यांनी तसा हुकूम दिला आणि गिरणीच्या आवाराला रणमैदानाचे स्वरूप आले. इकडे दरम्यान अय्यंगार आणि शर्मा यांचा पूर्ण निकाल लावण्यात आला होता. गोळिबाराचा प्रसाद अनेक कामगारांना मिळाला. सुमारे पन्नास कामगार जखमी झाले. कामगारांनी काय करून ठेवले आहे हे लक्षात आल्यावर पोलिसखाते हादरले. धरपकडीला प्रारंभ झाला आणि बघता बघता २३१ लोकांना पकडण्यात आले. पळवून नेणे, दंगा करणे, कट करून गुन्हा करणे आणि खुनीहल्ला चढविणे यांसारखे आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले आहेत. आता त्याचे जे काय व्हायचे ते न्यायालयात होईलच. घडून गेलेल्या या प्रकारामागची पार्श्वभूमी लक्षात घेतली तर २० ऑक्टोबर ते ६ डिसेंबरपर्यंतचा हा सहा आठवड्यांचा काळ चांगलाच तापदायक होता. याच काळामध्ये कामगारांपैकी भडक माथ्याच्या मंडळींनी आक्रमक धोरण स्वीकारले. गिरणीचे चिटणीस अगरवाल यांच्यावर २७ ऑक्टोबरला जे अत्याचार करण्यात आले ते पचल्यावर या मंडळींनी जास्त आक्रमक धोरण स्वीकारले. दादागिरी करणाऱ्या कामगाराचा एक गटच तयार झाला आणि ६ डिसेंबरचे लाजिरवाणे हत्याकांड एवढ्या लोकांच्या उपस्थितीमध्ये मार्गी लागले.

लोकसभेचे माजी सदस्य आणि उद्योगपती पद्मभूषण शेठ एम्. जयपुरिआ यांचे सिताराम हे चिरजीव, तर स्वदेशी मिलचे विद्यमान सूत्रधार डॉक्टर राजाराम हे शेठजीचे मानसपुत्र. राजाराम आणि सिताराम यांचे संबंध सलोख्याचे नाहीत. हा सारा दुर्दैवी प्रकार घडला, तेव्हा, डॉक्टर राजाराम जयपुरिआ हे कानपूरमध्ये नव्हते. कानपूरसारख्या मोठ्या औद्योगिक शहरामध्ये अशी मनमानी झाल्यावर राज्यशासनाला काही तरी हालचाल करणे भागच होते. या प्रकारामध्ये दोन अधिकारी मारले गेले तर नऊ कामगार गोळीबाराला बळी पडले. या भयावह हत्याकांडाची चौकशी करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली असून चौकशीअधिकारी म्हणून अलाहाबाद विभागाच्या कमिशनरची नेमणूक करण्यात आली आहे.

पैशाच्या व्यवहाराबाबत अधिक चौकशी केली असता असे आढळते की, औद्योगिक विकास बँकेच्या निष्काळजी धोरणामुळे हे प्रकरण रंगू लागले. स्वदेशी पॉलिटिक्स या कंपनीचे शेअर्स खुल्या बाजारामध्ये विकण्यात यावेत असे गिरणीमार्फत सुचविण्यात आले. ही मागणी बँकेने मंजूर केली असती तर चार कोटी रुपयांची रक्कम उभी राहू शकली असती. राज्यसरकारने शेअर्सच्या विक्रीसाठी मंजुरी दिल्यावरही बँकेने तसे करण्याचे नाकारले. उत्तर प्रदेश सरकारचे या कटकटच्या गिरणीच्या प्रश्नांबाबत निश्चित धोरण नाही. हे सारे महाभारत घडले त्याच्या आगेमागे मुख्यमंत्री स्वतःच्या निवडणुकीच्या विवंचनेमध्ये मश्गुल तर बाकीच्या मंत्र्यांमध्ये अनेक बाबतीत मतभेद. प्रत्येक मंत्री आपल्याच तोऱ्यात. दोन खात्यांमध्ये सामंजस्य नसल्याने साराच गोंधळ. मजूरमंत्री गणेशदत्त बाजपायी म्हणतात, सरकारने केवळ आर्थिक दृष्टिकोनातून या प्रश्नाकडे पाहू नये. कारण आठ हजार कामगार या प्रश्नाशी सबधित आहेत. त्यामुळे विशेष आपुलकीने या प्रश्नाची हाताळणी व्हावी. गिरणीचा कारभार सुरळीत चालण्यासाठी वक्तशीर पगार होणे आवश्यक आहे आणि अर्थमंत्री मधुकर दिघे पैसा सोडायला तयार नाहीत. ते म्हणतात, गिरणीला पूर्वीच मोठ्या रकमेची कर्जे देण्यात आली असून दिलेला पैसा वसूल करणे अवघड होऊन बसले आहे. अशा परिस्थितीमध्ये मोठ्या रकमा नव्याने उपलब्ध करून देणे शक्य होणार नाही. तर वीजखात्याचे मंत्री म्हणतात, गिरणीच्या नावे ९८ लक्ष रुपयाची थकबाकी आहे. पगार देण्याची जबाबदारी संचालकाची आहे. रिसीव्हर नेमला तोच मुळी वीजबिलाची थकबाकी वसूल व्हावी म्हणून ! ! असा हा सगळाच गोंधळाचा मामला. दहा–अकरा लोकाची हत्या झाल्यावर आता लखनौला जाग आली आहे. मंत्रिमंडळाने या आजारी गिरणीच्या चौकशीसाठी एक उपसमिती नेमली आहे. अखिल भारतीय ट्रेड युनिअन काँग्रेसचे चिटणीस के. जी. श्रीवास्तव यांनी केंद्रीय शासनाने ही आजारी नव्हे गंभीर आजारी गिरणी चालविण्यास घ्यावी असे सुचविले; परंतु कोणतीही आजारी गिरणी नव्याने ताब्यात घेणार नाही असे केंद्रशासनाने स्पष्टपणे सांगितल्याने आता सारेच प्रकरण राज्यसरकारच्या उद्योगखात्याकडे परत आले आहे. आता उपसमिती कोणता अहवाल देते आणि आठ हजार कामगाराच्या जीवनाशी निगडित असलेला प्रश्न कशा प्रकारे सोडविते ते पहायचे. दरम्यान गिरणीमध्ये चोवीस तास पोलिस-पहारा बसविण्यात आला आहे. व्हायचे ते सारे होऊन गेले आणि आता पोलिस राखणीला बसले आहेत.

□